साहित्यचंद्रिका.

कर्ता

हरि माधव समर्थ.

प्रकाशक

नारायण नरसिंह फडणीस.

किंमत १ रुपया.

साहित्यचंद्रिका.

' निमित्त मात्रं भव सव्यसाचिन् ' गीता.

हें काव्यविषयक

पुस्तक

हरि माधव समर्थ

शिक्षक, न्यू इंग्लिश स्कूल, जळगांव.

यांनीं अनेक ग्रंथाधारें तयार केलें

तें

नारायण नरसिंह फडणीस

संपादक काव्यरत्नावली

यांनीं आपल्या बावजी स्टीम प्रिंटिंग प्रेस,

जळगांव-मध्यें छापून प्रसिद्ध केलें.

१९२४

किंमत १ रुपया.

प्रकाशकाचे दोन शब्द.

अगदीं सोप्या भाषेंत काव्यविषयाला लागणारी रस, गुण, वृत्त, अलंकार इत्यादिकांविषयीं माहिती सोदाहरण एकत्र करून आटोपसर रीतीनें प्रसिद्ध झाल्यास विद्यार्थी, रसिक आणि साधारण वाचक ह्या सर्वांस ती उपयुक्त झाल्यावाचून राहणार नाहीं अशी आमची कित्येक दिवसाची ठाम समजूत होती. भगवंताच्या कृपेनें आणि आमच्या नूतन परिचयांतील मास्तर कवि हरि माधव समर्थ यांच्या परिश्रमानें आमची मनीषा आज पूर्ण होत आहे. रा. समर्थांनीं काव्यरत्नावली मासिकास कांहीं मदत व्हावी म्हणून ह्या पुस्तका संबंधीं सर्व हक्क आमच्या स्वाधीन केले आहेत, ही विशेष गोष्ट होय पुस्तकांतील उदाहरणाचीं (श्लोक, आर्या इत्यादि) पद्यें परिचयांतलीं असल्यानें विषय अधिक सुलभ होईल असें वाटतें, हें एक, दुसरें विद्यार्थ्यांच्या सोयीकरितां आर्यावृत्तांत रस, गुण व अलंकार यांच्या व्याख्या गोंविल्या आहत. वृत्तांच्या व्याख्या नवीन तयार केल्या आहेत त्या अशा संकेतानें कीं, वृत्ताचें नांव, त्याच्या पदांतील अक्षर संख्या, विराम स्थानें, आणि ऱ्हस्व दीर्घ अक्षरांचा क्रम हीं सारीं एका ओळींत सूचित व्हावी.

आमच्या कांहीं कविमित्रांच्या सूचनेवरून आधुनिक कवींच्या कवनांतील उतारे परिशिष्टांत दिले आहेत.

रत्नावलीचे रसिक वाचक आणि काव्य विषयाचे चाहाते आमच्या ह्या यत्नास उदार आश्रय देतील ही उमेद आहे.

नारायण नरसिंह फडनीस

संपादकः— **काव्यरत्नावली.**

प्रस्तावना.

कंठीं सुंदर कुंद माल मिरवी जी पूर्ण चंद्रानना ॥
जीचें अंबर शुभ्र जी करिं धरी वीणा सुपद्मासना ॥
जी देवां बहु वंद्य जी जडपणा निःशेषही संहरी ॥
पावो माय सरस्वती भगवती ती श्रेष्ठ वागीश्वरी. ॥

शद्व आणि अर्थ त्यांच्या योगानें रसभरित आणि मनोरंजक झालेलें असें वास्तविक अथवा कल्पित वस्तूंचें जें वर्णन त्यास काव्य ह्मणतात. काव्याचे दोन प्रकार आहेत, पद्य आणि गद्य. ज्याला पाद किंवा चरण आहेत तें पद्य आणि ज्याला पाद नाहींत तें गद्य.

शद्व आणि अर्थ मिळून काव्याचा देह होय; रस हा त्याचा आत्मा होय आणि प्रसाद ओज आणि माधुर्य हे त्याचे गुण होत. सुरस अर्थ रचनेनें आणि चमत्कारिक शद्वरचनेनें वर्णन अलंकृत करण्याचा काव्य-कर्त्यांचा परिपाठ पुष्कळ आहे. पहिल्या प्रकारचे अलंकार ह्मणजे अर्थालंकार हे प्रमुख होत; दुसऱ्या प्रकारचे ह्मणजे शद्वालंकार हे गौण होत. हे अर्थालंकार आणि शद्वालंकार अनेक आहेत.

पद्यरूप काव्याच्या अक्षर नियमांला आणि मात्रा नियमांला छंद किंवा वृत्त ह्मणतात. हे छंद ही अनेक आहेत.

भाषेचें ज्ञान, छंदांची, अलंकारांची, रसांची, गुणांची वगैरे सोदाहरण माहिती, चांगल्या कवींच्या काव्यांची व इतिहासादिकांची ओळख आणि अव्याहत अभ्यास ह्या गोष्टी एकत्र झाल्या कीं काव्यरसाची गोडी घेण्याला आणि नवीन काव्यें रचण्याला अडचण पडत नाहीं. ह्या गोष्टी पैकीं छंद, अलंकार, रस, गुण या आटोपसर रीतीनें ह्या पुस्तकांत संकलित केल्या आहेत, ह्मणून या पुस्तकाला साहित्यचंद्रिका हें नांव योजिलें आहे.

आतां या पुस्तकांत दोष असतील हें निःसंशय होय; तरी रसिक सज्जन गुणलेशाचें सदय अंतःकरणानें ग्रहण करितील ही आशा आहे.

—×—

साहित्यचंद्रिका.

(१) कवि आणि कविता.

श्लोक– शार्दूलविक्रीडित.

चित्ता रंजविते, प्रसन्न करिते, जी विद्ध[1] ना बद्ध जी ॥
शद्बार्थीं प्रतिभा,[2] जियेंत सुलभा, रूपें गुणें श्रुद्ध जी ॥
वर्णी ईशगुणा, सुविश्वरचना कीं योजना मानवी ॥
मानूं ती कविनिर्मिता सुकविता सालंकृता मा[3] नवी ॥

जी चित्ताचें रंजन करिते, जी चित्त प्रसन्न करिते, जी स्वाभाविक सरळ अशी आहे, जिच्या ठायीं शद्बांची व अर्थाची क्लिष्टता नाहीं, जी प्रतिभा पूर्ण–उज्ज्वल अशी आहे, जी अंतर्बाह्य–शद्बार्थांनीं श्रुद्ध–निर्मल आहे, ती कविकृत कविता ईश्वरगुणवर्णनपर असो, सृष्टिसौंदर्यवर्णनपर असो, अथवा मानवी–कृति–वर्णनपर असो ती आमच्या मतें नवी अलंकारयुक्त लक्ष्मीच होय.

(२) काव्यांतील रस.

वाचकांच्या आणि श्रोत्यांच्या हर्षविषादादि चित्तवृत्ती उचंबळून जाव्या, उत्कट व्हाव्या, हा काव्यकर्त्या कवींचा प्रधान हेतु असतो. चित्तवृत्ति उत्कट झाली ह्मणजे रसनिष्पत्ति होते. रसाला काव्याचा आत्मा ह्मटलें आहे तें यावरूनच. चित्तवृत्तींच्या प्रकारानुरूप नऊ रस संस्कृतांत मानिले आहेत. मराठींत आपल्या संतकवींनीं दहाव्या भक्तिरसाची भर

१ क्षत, तुटक २ उज्ज्वलता ३ लक्ष्मी.

घातली, इतकेंच नव्हे तर आपल्या काव्यांतून त्याला अग्रपूजेचा मान देऊन फारच बहार उडवून दिली आहे. असो. या दहा रसांचीं नांवें व लक्षणें येथें थोडक्यांत देतों.

१ **भक्तिः**— ईश्वरभक्तिविषयक वर्णनांत भरलेला आढळतो तो;

२ **शांतः**— संसाराची निःसारता, मनाची उपरति, सत्समागम, तीर्थादिकांच्या शांतिप्रधान वर्णनांत असणारा तो;

३ **वीरः**— युद्धविषयक शौर्य, धैर्य, गर्वोक्ति इत्यादिकांच्या, अथवा इतर प्रसंगीं जें जिंकावयाचें किंवा ज्यावर तावा मिळवावयाचा त्या संबंधीं उत्साह, धीटपणा, निश्चय इत्यादिकांच्या वर्णनांत असणारा तो;

४ **शृंगारः**— विशेषतः स्त्रीपुरुषांतील प्रीतिविषयक वर्णनांत असणारा तो; याचे **संभोग** आणि **विप्रलंभ** असे दोन भेद आहेत. नायक व नायिका, पुरुष व स्त्री यांचा समागम वर्णिला असतो तेथें संभोग आणि नायक व नायिका, पुरुष व स्त्री यांचा विरह वर्णिला असतो तेथें विप्रलंभ शृंगार होतो,

५ **करुणः**— दुःखशोकादिकांच्या वर्णनांत असणारा तो;

६ **अद्भुतः**— लोकोत्तर किंवा विस्मय उत्पन्न करणाऱ्या वर्णनांत असणारा तो;

७ **हास्यः**— हसूं येईल अशा–विशेषतः थट्टास्पद अशा वर्णनांत असणारा तो;

८ **भयानकः**— ज्याच्या योगानें भीति उत्पन्न होते अशा भीतियुक्त प्रसंगाच्या वर्णनांत असणारा तो;

९ **वत्सलः**— माता–पिता, बंधु–भगिनी, पुत्र–कन्या, इष्ट–मित्र इत्यादिकांतील ममतेचें, वत्सलतेचें वर्णन केलें असतां उद्भूत होणारा तो.

१० उदात्तः— अरण्यें, पर्वत, नद्या इत्यादि सृष्टिसौंदर्याच्या अथवा एकाद्या प्रसंगाच्या यथार्थ वर्णनांत साधारणतः असणारा तो.

काव्यरसलक्षण–आर्या.

भक्ति हरीची दावी प्रथम रसा, चित्त शांति जो दे तो ॥
रस **शांत** होय दुसरा, अग्रस्थल यांस संत कवि देतो ॥ १ ॥
उत्साह, धैर्य, युद्धीं शौर्याच्या आणखी प्रसंगींही ॥
उत्कट करिती शूरीं **वीररस** वृत्ति विप्रसंगीं ही ॥ २ ॥
भोग वियोगजनितचो नरनारी प्रीतिरीति वर्णियली ॥
कवनीं चतुर्थ रस ती रसिकीं **शृंगार** वृत्ति मानियली ॥ ३ ॥
दुःखाच्या शोकाच्या नानाविध वर्णनीं उचंबळते ॥
ती वृत्ति **करुण** नामा रस, तेणें चित सहज कळकळतें ॥ ४ ॥
विस्मय मनीं उपजवी लोकोत्तर योग वर्णुनी कविता ॥
साधी षष्ठ रसा ती **अद्भुत** नामेंचि कार्य जो करिता. ॥ ५ ॥
थट्टास्पद वर्णन जें श्रोत्या कीं वाचका हसूं आणी ॥
कवनाप्रति तें देतें **हास्य** रसा सप्तमा स्ववर्णांनीं. ॥ ६ ॥
जें वाचितांचि अथवा आयकितांही मनांत भय भरतें ॥
साधी **भयानक** रसा वर्णन, तेणें शरीर थरथरतें. ॥ ७ ॥
माता, पिता, सहोदर कन्या, सुत, इष्ट, मित्र, यांतील ॥
ममता वर्णन करितां **वत्सल** रस नवम कवन साधील. ॥ ८ ॥
नग, वन, उद्यानादिक सृष्टीचें विभव योग्य वर्णून ॥
कवनीं कवि रस साधी दशम **उदात्त** प्रसंग पाहून. ॥ ९ ॥

काव्यरसांचीं उदाहरणें.

(१) भक्तिरस.

ज्ञानेश्वर, मुक्तेश्वर, एकनाथ, श्रीधर, महीपति, रामदास, नामदेव, तुकाराम, वामन, मोरोपंत इत्यादि संतकवींच्या काव्यांतून हा रस

ओथंबलेला आहे. येथें उदाहरणार्थ भक्तशिरोमणि श्रीतुकाराम महाराजांचा एक अभंग देतोंः—

अभंग.

सदा माझ्या डोळां, जडो तुझी मूर्ती,
रुक्मिणीच्या पति सोयरीया ॥ १ ॥
गोड तुझें रूप, गोड तुझें नाम,
देईं मज प्रेम, सर्वकाळ ॥ २ ॥
विठो माउली ये, हाचि वर देईं;
येऊनियां राहीं, हृदयीं माझ्या ॥ ३ ॥
तुका ह्मणे कांहीं, न मागें आणिक,
तुझें पायीं सूख, सर्व राहे. ॥ ४ ॥

(२) शांतरस.

जसा भक्तरस तसा हा शांतरसही तुकारामादि संतकवींच्या कांव्यांत ओथंबलेला आहे त्याचीं उदाहरणें किती तरी देतां येतील. येथें तुकोबांच्या अभंगांतून एक अभंग देतोंः—

अभंग.

कवणाचें घर कवणाचें दार,
सोडोनी संसार जाणें लागे ॥ १ ॥
जाणे लागे अंतीं एकला एकट,
व्यर्थ खटपट जन्मवरी ॥ २ ॥
जन्मवरी जाण संसारीं गोविलें,
नाहीं कांहीं केलें आत्महित ॥ ३ ॥
आत्महित गेलें संसाराचे ओढी,
अंतीं कोण सोडी रामावीण ॥ ४ ॥
घातकचि आहे लोकांचा तो संग,
ह्मणोनी निःसंग तुका राहे ॥ ५ ॥

(३) वीररस.

वर्णनांत उत्साह प्रदीप्त झाला ह्मणजे वीररस व्यक्त होतो. उत्साहाचा जो हेतु असेल त्या हेतूच्या अनुरूप नांवानें कित्येक ग्रंथकार ह्या रसाचा निर्देश करितात; जसें युद्धाविषयीं उत्साह असला कीं युद्धवीर, भक्तीविषयीं उत्साह असला कीं भक्तिवीर, दानाविषयीं उत्साह असला कीं दानवीर, धर्माविषयीं असला कीं धर्मवीर, इत्यादि.

युद्ध (पर) वीररस.

भीष्मार्जुनयुद्धप्रसंगांतील पुढील वामन पंडितांचे श्लोक पहाः—

श्लोक.

गांगेय तापा चढला कसा रे। ज्या मानिती हाचि कृतांत सारे॥
गर्जोनिया सिंहरवें जयातें। पाहे जणों मारिल आज यातें॥१॥

त्वां काय कर्म करिजे लघु लेंकरानें॥
बोलोनियां मग धनू धरिलें करानें॥
तें व्यापिलें सकल सैन्य महाशरांनीं॥
भीष्में, जसा पतित होय हुताश रानीं॥ २॥
गर्वोक्ति फाल्गुन वदे जगदेकराया॥
आहे मशीं कवण तो झगडा कराया॥
म्यां कालखंज वधिले अतुल प्रतापी॥
पौलोमही असुर गोसुर-विप्रतापी॥ ३॥

सीतास्वयंवरप्रसंगीं शिवधनुभंगाविषयीं रावणाची उक्ति **आनंद-तनयांनीं** आपल्या काव्यांत गोंविली आहे ती पहाः—

श्लोक-स्रग्धरा.

दंतीं म्यां देवदंती धरुनि मुरडिला शैल कैलास गाढा,॥
घेतां हस्तीं समस्तीं कडकडति कडे काय ती कालदाढा!॥
थेथें या कांबिटाचा गरिमगुण किती प्रौढि ही कोण येणें॥
माझ्या गाजोनि भूजा ह्मणति मज असा कायसा यास घेणें॥

अभिमन्युवधप्रकरणीं मोरोपंतांनीं पुढील आर्यांत वीररस किती उत्कृष्ट साधला आहे पहाः—

गीति–आर्या.

सौभद्र ह्मणे शिरतों व्यूहीं डोहीं जसा मतंगज वा ॥
हरिपोत दंतियूथीं, कीं दहनीं करुनिया पतंग जवा ॥
जेष्ठ पित्याला देउनि अभय ह्मणे तो सुवीर सूतातें ॥
हूं हांक रथ, ह्मणावी माय सुभद्रा सुवीरसू तातें ॥
तो सूत सुमित्र ह्मणे भो ! आयुष्मन् कुमार आपण कीं ॥
हाकिन हरि अरिवरि परि कुरुगुरुशीं गांठि कठिण हा पण कीं ॥
हांसुनि सौभद्र ह्मणे हटकीन हठें रणांत भीमातें ॥
शक्रार्जुनकृष्णांशीं करितां समर न शिवेल भी मातें ॥

भक्तिविषयक उत्साहानें वीररस उत्तम साधला आहे असा तुकोबांचा पुढील अभंग विश्रुत आहेः—

अभंग.

घोंटवीन लाळ ब्रह्मज्ञान्यांहातीं,
मुक्ता आत्मस्थिती, सांडवीन. ॥
ब्रह्मभूत होते कायाच कीर्तनीं,
भाग्यें तरी रिणी देव ऐसा. ॥
तीर्थ भ्रामकासी आणीन आळस,
कडू स्वर्गवास, करिन भोग. ॥
सांडवीन तपोधना अभिमान,
यज्ञ आणि दान लाजवीन. ॥
भक्तिभाग्यसीमा साधीन पुरुषार्थ,
ब्रह्मींचा जो अर्थ निज ठेवा. ॥
धन्य ह्मणवीन इहलोकीं लोकां,
भाग्यें आह्मीं तुका देखियेला. ॥

(४) संभोग-शृंगार.

नारदानें दिलेलें पारिजात पुष्प श्रीकृष्णानें आपणास दिलें नाहीं ह्मणून सत्यभामा त्यावर रुसली; तिला समजावून श्रीकृष्णानें तिची वेणी घातली; त्याविषयीं वर्णन वामन पंडितांनीं भामाविलास प्रकरणांत केलें आहे, त्यांतील उतारा:—

श्लोक-भुजंगप्रयात.

अशी ते बुझावोनि रंभोरु हातें
तिच्या धूतसे हो भुखांभोरुहातें
उटी लावुनी वाटल्या केशरा जी
स्वहस्तांबुजीं विंचरी केशराजी

मालिनी.

करि हरि यमुना हो मूद गंगावनाची
मिरवि धवलपुष्पीं दीप्ति गंगावनाची
सित असित नद्यांच्या संगमीं श्री त्रिवेणी
तशिच यदुपतीनें घातली चित्रवेणी

उपजाति.

मुखेंदु शोभे बहु भामिनीचा । नीचा दिसे हा पति यामिनीचा
नक्षत्रसेना जशि सिंधुजाची । ज्याची चमू मौक्तिकसिंधु जाची

विप्रलंभशृंगार.

श्रीकृष्ण-विरहानें व्याकुळ झालेल्या गोपी उद्धवास ह्मणतात:—

मोरोपंती आर्या.

कुब्जेचा भाग्याचा भारी भर आजि आमुचा सरला
सरला असोनि आह्मी वक्रा, वक्रा असोनि ते सरला
उद्धवजी ! केली कीं ती कुब्जा पूर्णकामना सज्जुनी
त्यज्जुनि नवी रसिकाच्या मैत्री येईल का मनास जुनी ?

जेणें माय त्यजिली, दे बहु लालन करूनि उद्धव जी
त्या आह्मी कोण? वृथा रुसतां मुग्धा ह्मणोनि उद्धवजी !

(५) करुणरस.

श्रीरामचंद्र वनवासास गेल्यावर भरत स्वमातेचा धिःकार करून कौसल्येकडे गेला त्या वेळीं उभयतांसही शोकाचा वेग आला, त्याचें वर्णन वामन पंडित करितातः—

श्लोक.

धिःकारूनी गोष्टि मातेसि सांगे
कौसल्येच्या थे गृहा सानुरागें
त्यातें देखे जेधवां राममाय
तेव्हां त्यांचा शोक लोकीं न माय.

मोकळा करुनि कंठ तेधवां ॥ आठवूनि मनिं जानकीधवा
ते रडे भरतही तसा रडे ॥ जोंवरी नयन होति कोरडे

दमयंतीचा नलप्रीत्यर्थ विलाप रघुनाथ पंडितांनीं वर्णिला आहे.

श्लोक-वसंततिलका.

प्राणेश्वरा ! त्यजसि कां मज एकलीला
होऊनिया वश तया अदया कलीला
गेलासि हाय ! नलराय ! कुठे? वदान्या
अन्या न होय भुवनीं मजशीं अधन्या
प्राणप्रिया ! सहृदया ! वद शद्ब कांहीं
प्राणप्रियेस तव रक्षक येथ नाहीं
मंदस्मिता करुनि हर्षविलेंसि जीतें
कां आजि मौन धरुनी छळितोसि तीतें ?

श्रीरामचंद्र सीतेचा शोक करितात, त्याचें वर्णन उत्तररामचरित्रांत दिलें आहे:—

श्लोक

हा ! हा ! देवी ! हृदय फुटतें देह माझा गळाला
वाटे शून्य त्रिभुवन मला अंतरात्मा जळाला
या आत्म्यानें किति तरि सदा दुःखभारा धरावें
मोहव्यापी फिरफिरुनियां काय आतां करावें ?

(६) अद्भुतरस.

सीतास्वयंवरसमयीं सुकुमार रामचंद्रानें विशाल शिवधनुष्य लीलामात्रें-करून उचलिलें त्याचें वर्णन वामन पंडित करितातः—

श्लोक.

छावा उठे दशरथप्रभुदिग्गजाचा
घे चाप इक्षुसम तें पति भर्ग ज्याचा
शुंडास्वबाहु उचलोनिच चालिला हो !
घेती समस्त नयनीं प्रभुचाचि लाहो

सीता आणि लोपामुद्रा ह्यांचा सेतुबंधनविषयक संवाद वामन पंडितांनीं सांगितला आहे; त्यांतलि पुढील श्लोक आहेत.

श्लोक.

जे जळांत बुडणार तीव्र ते
थोर पर्वत अवो पतिव्रते
सागरीं तरति सेतुवाट ते
हे अतर्क्य करणीच्च वाटते
परततां जळधीवरि पाहतें
तरति पर्वत विस्मित पाहतें
जळतळीं वरि हो धरणी सये
कधि नये तुळणा करणीस ये.

दमयंतीच्या रूपरचनेचें वर्णन रघुनाथ पंडित करितात:—

श्लोक-वसंततिलका.

धाता करींच करितां मृदु ते न होती
या कारणास्तव मनोमय मूस ओती
तेथें भरोनि पहिला रस पूर्ण केली
ओंतीव हे न घटिता कृति बोलिजेली

श्रीरामचंद्रानें केलेल्या शिवधनुर्भंगाचें आनंदतनय वर्णन करितात:—

श्लोक-स्रग्धरा.

रामें लोकाभिरामें मदनशतसमें पूर्ण कल्याणधामें
लीलाभूभृल्ललामें तुकुनि शिवधनू ओढिलें पूर्णकामें
ओढी घेतां तडाडी निबिड दशदिशीं घोष मोठा झडाडी
मध्यें भंगे कडाडी प्रतिनिनद नभीं मेघ जैसा गडाडी

अभिमन्यूच्या पराक्रमाचें वर्णन ऐकून धृतराष्ट्र ह्मणतो:—

मोरोपंती आर्या

अंध ह्मणे रे ! संजय ! हें त्या पौत्रास वर्ष सोळावें
लेळावें मांडिवरी तेणें द्रोणादिकांसि घोळावें ?

(७) हास्यरस.

एकदां रुक्मिणीनें भीमाला बोलावून भाउबीज साजरी केली तिचें वर्णन उत्सव प्रकाशकार करितात:—

शार्दूलविक्रीडित.

मी भीमाप्रति भाउबीज करितें कांता हरीची ह्मणे
माझी ही उरवा हऊस सखया, द्या त्यास आमंत्रणें
बोले कृष्ण भरींस या पडशि कां ? खादाड तो केवढा !
धान्याचा फडशा करील सखये, हेतू त्यजीं एवढा

बोले श्री न उणें अह्मांस, कितिसें खाणार तो पाहुं या
मी वाढीन तयास पोट भरुनी जा बोलवा हो! उद्यां
ऐसा आग्रह पाहुनी मग हरी आमंत्रणातें करी
येई चालत कांपवी धरणितें तो भीमही लौकरी
भीमानें उपटोनिया वटतरू मार्गींच पत्रावळी
मोठी कोसभरी करोनि अणिली! ऐसा पहा तो बळी
जेवाया बसण्यास लौकर करी चौरंग अद्रीपरी
बोले रुक्मिणि वाढ भूक मजला भारी करी बावरी
न्हाऊं घालिन बंधुराज ह्मणते ती रुक्मिणी त्याजला
राहो न्हाण तुझें क्षुधेकरुनिया मत्प्राण हा गांजला
ऐकोनी मग रुक्मिणी निघतसे वाढावया सत्वर
तो नाजूकचि राजपुत्र ह्मणुनी मार्गेंचि घेई कर

उपजाति.

हळूं हळूं वाढितसे तदा ते। मनीं बहु क्रोधचि ये तयातें
घरांत ती वाढुनि शाक जाय। नाणी पदार्था तरि तोचि खाय

इंद्रवज्रा.

एका पदार्थासह भेट नाहीं। अन्यास, तो चाटित बोट पाही
तोंडाकडे, तीप्रति पाठमोरी, जाऊं न देईच असा अघोरी

उपजाति.

भातास भाजीस न गांठ येई। क्षणक्षणा फारचि पाठ घेई
बाई! असें चाळवितां कशाला?। बोलावुनी मांडितसा हशाला!

शार्दूलविक्रीडित.

मांडे, भात, वडे, खिरीहि जिलब्या लाडू बहू झोडिले
तेवीं पापड, लोणचें, चिकवड्या जे घारगे वाढिले
ते सारेचि करोनि चट्ट, नुकता जैसा बसे भोजना
त्या श्रीची कटि वाढवाढुनि ढिली होता धरी वेदना!

हा नाजूक बहूत बाळ ह्मणुनी ठाऊक पूर्वीं जरी
होतां, भानगडींत या न पडतें कालत्रयीं मी तरी
ऐसें बोलतसे मनांत, उदरीं याच्या शिरोनी जसा
राहे राक्षस, पाहिलाहि न कधीं मोठा अधाशी असा

(८) भयानकरस.

स्वयंवरसमयीं रावणानें शिवधनुष्यास हात घातलेला पाहून सीता भयभीत झाल्याचें वर्णन आनंदतनय करितातः—

शार्दूलविक्रीडित.

लंकानायक सायकासनगुणी सज्जावया सज्जला
तों सीता भयकंपिता, जन महा चिंतांबुधीं मज्जला
झाल्या म्लानमुखी मनोरम सखी, तो जों भुजा सांवरी,
तो आकार विकार देखुनि उठे हाःकार माडीवरी.

दुःशासनवध प्रकरणांतील पुढील आर्या पहाः—

मोरोपंती आर्या.

मग कंठनाळ अरभर तो सत्य करावया बिरुद कापी
मिटक्या देउनि मटमट, घटघट त्या स्वाहितासुगुदका पी
जे जे लोकीं असती रस त्यांची तों न माधुरी थोडी
परि अरिच्या रक्तरसीं मज बहु त्याहून लागली गोडी
ऐसें वदोनि ओष्ठप्रांत जिभेनें पुनः पुन्हा चाटी
अवलंबी अत्युग्रा भीम अमृतद्विपारिची धाटी
रिपु शूर दूर तेथुनि तें दारुण कर्म पाहतां पळती
किति पडती, किति दडती, किति एकांचीं धृतायुधें गळती

(९) वत्सलरस.

श्रीरामचंद्र वनवासास गेल्यावर त्याला परत आणण्याकरितां भरत गेला असतां रामचंद्राचें वात्सल्य पंडितांनीं वर्णिलें आहेः—

श्लोक–उपजाति.

रडे फुंदफुंदे शिरीं पादपद्मा । धरी सद्म मानीतसे नित्य पद्मा
बळें क्षेम घे त्यास ओढून राम । स्वभक्तप्रिय स्वामि भक्ताभिराम

स्वागता.

मांडियेउपरि बैसविला हो । अश्रुनीर पुसि हें सुख लाहो
बांसरा न रड सांग सुवार्ता । शद्व हा निबवि दुःखद वार्ता

हरवलेला मुलगा प्रद्युम्न पुष्कळ दिवसांनीं सांपडलेला पाहून रुक्मिणीची जी स्थिति झाली तिचें वर्णन कृष्णविजयांत मोरोपंतांनीं केलें आहे.

श्लोक–स्रग्धरा.

वैदर्भी यास पाहे, द्रव हृदयिं धरी, तत्क्षणीं स्तन्य वाहे
कीं ते आनंद लाहे, जरि तनुज असे ज्ञात होणेंचि आहे
बाष्पानें कंठ दाटे सकल तनुवरी क्षिप्र रोमांच थाटे
शोकाचा सिंधु आटे त्वरित परम तद्दर्शनीं लोभ वाटे

(१०) उदात्तरस.

नलराजा हंसास हळूच धरितो आणि हंस सुटून जाण्याचा यत्न करितो, त्या प्रसंगाचें रघुनाथ पंडित यथातथ्य वर्णन करितातः—

श्लोक–वसंततिलका.

त्यांतील एक कलहंस तटीं निजेला
जो भागला जलविहार विशेष केला
पोटींच एक पद, लांबविला दुजा तो
पक्षीं तनू लपवि भूप तया पहातो
टाकी उपानह, पदें अतिमंद ठेवी
केली विजार वरि डौरहि मौन सेवी
हस्तीं करीं वलय उंच अशा उपायीं
भूपें हळूंच धरिला कलहंस पायीं

श्लोक-मालिनी.

कलकल कलहंसें फार केला सुटाया
फडफड निजपक्षीं दाविलें कीं उडाया
नृपतिस मणिबंधीं टोंचिता होय चंचू
धरि सदृढ जया त्या काय सोडील पंचू

(पुढील श्लोकामध्यें एकंदर दहा रसाचा उल्लेख आहे.)

वामनी श्लोक.

दे मल्लां रस रौद्र अद्भुत नरां, शृंगार नारीजनां,
गौळ्यां हास्य, नृपांस वीर, करुणा मातापित्यांच्या मना
कंसालागिं भयानकाख्य रस दे, बीभत्स मूढां श्रमें
संतां शांतरस, स्वभक्तिरस तो दे यादवां या क्रमें

(३) काव्यगुण.

काव्यांतील रसांचे परिपोषक जे धर्म–ज्या धर्मांच्या योगानें रस पुष्ट होतात, त्यांस गुण असें ह्मणतात. हे प्रधान गुण तीन आहेत, प्रसाद, ओज आणि माधुर्य वर्णनांतील निरनिराळे रस ज्या रीतीनें साधिले असतील त्याप्रमाणें हे गुण संभवतात. ह्या गुणांचीं लक्षणें अशीं आहेत:—

आर्या.

अर्थ कळाया नलगे श्रम करणें चित्त सहजही रमतें
कवनीं **प्रसाद** असतां, नसतां गुण तो न देह कीं शव तें
शब्दार्थाभरणांनीं कठिणाक्षरमंडिता समासांनीं
कविता गुण **ओज** वरी नटुनी नवरीपरी सुरत्नांनीं
शृंगार अल्प अंगीं, कोमल पद शब्द नादही रुचिर
ऐशी कविता साधी, साधी **माधुर्य** नाम गुण मधुर

प्रसाद गुण.

हा गुण सर्व रसपरिपोषक आहे. जेथें वर्णनांतील अर्थ सहज लक्षांत येऊन चित्ताची सहज प्रसन्नता घडते तेथें हा गुण असतो. नामदेव तुकारामादि संतकवींच्या प्रेमोद्गारांत तसाच अनेक इतर कवींच्या स्वभावोक्तिपूर्ण वर्णनांत हा रस विपुल आढळतो. मुक्तेश्वर, नामदेव, तुकाराम रघुनाथ पंडित यांची कविता जितकी प्रासादिक आहे तितकी श्रीधर, वामन, मोरोपंत यांची नाहीं; तथापि पुष्कळ ठिकाणीं यांनींही हा गुण बराच साधला आहे.

अभंग—तुकारामाचे.

अंतरीं निर्मळ, वाचेचा रसाळ,
त्याच्या गळा माळ असो नसो
आत्मा अनुभवी चोखाळिल्या वाटा
त्याचे माथा जटा असो नसो
परद्रव्या अंध निंदेसी जो मूका
तोचि संत देखा तुका ह्मणे

जे का रंजले गांजले त्यासि ह्मणे जो आपुलें
तोचि साधु ओळखावा देव तेथेंचि जाणावा
दया करी जे पुत्रासी तेचि दासा आणि दासी
तुका ह्मणे सांगो किती तोचि भगवंताची मूर्ति

उंच वाढला एरंड तरि का होईल इक्षुदंड
जरि गर्दभ वेगें धावे तरि का अश्वमोल पावे
तुका ह्मणे तोचि थोर ज्याचे मुखीं रघुवीर

पुण्य पर उपकार पाप ते परपीडा । आणिक नाहीं जोडा दुजा यासी
सत्य तेंचि धर्म असत्य तेंचि कर्म । आणिक हें वर्म नाहीं दुजें
गति तेचि मुखीं नामाचें स्मरण । अधोगति जाण विन्मुखता
संताचा हा संग तोचि स्वर्गवास । नरक तो उदास अनर्गळा
तुका ह्मणे उघडें आहे हित घात, । जयाचें उचित करी तैसें

श्लोक–वामनी.

अहो ! धन्य गौळी अहो ! धन्य नंद
व्रजीं सर्वही धन्य हा प्राणिवृंद
अहो ! भाग्य यांचें अहो ! भाग्य यांचें
सखे सोयरें ब्रह्म श्रीकृष्ण ज्याचें

ओज गुण.

शद्बार्थालंकारांच्या योगानें जेथें कवितेस विशेष शोभा आणिली असून विषयाचें अनुरूप वर्णन केलेलें असतें तेथें हा गुण असतो. वामन–मोरोपंत यांच्या काव्यांत हा गुण भरपूर आहे. क्रियेच्या अनुकरणवाचक शद्ब योजून केलेल्या वर्णनांत हा गुण सहज येतो.

उदाहरणें.

नृसिंहावतार प्रकरणांतील पुढील वामनी श्लोक पहाः—

श्लोक मालिनी.

पसरट मुख मोठें आंत दाढा कराळा
परम चपळ जिव्हा खड्ग जैसा निराळा
नयनयुगल जाणों तापलें हेमपाणी
बहुभुजनखशस्त्रें देखिला चक्रपाणी

द्रुतविलंबित.

अमर तो मरतो अति लौकरी
चपळ तो पळतो धरितां करीं
उखळला खळ लाघव लक्षणी
विलपती लपती सुर त्या क्षणीं

शिशुपालवधाचें कृष्णविजयांत मोरोपंतांनीं वर्णन केलें आहेः—

श्लोक–स्रग्धरा.

वृष्णींच्या शक्रचक्र त्वरित मग नगच्छेदना जेविं पाक–
द्वेषी वज्र स्वकर्मद्रुम फलततिच्या भोगवी जो विपाक
सोडी तोडी क्षणांत क्षितिवरि सहसा लोळवी चैद्यमस्ता
हस्ता जोडूनि वंदी स्तवि सदभयदा त्या सभा ती समस्ता

अनुकरण वाचक शब्दयोजनेचें उदाहरणः—

जेथें ज्वाळांचा धडधडाट । वंशकाष्ठांचा तडतडाट
लाख जळतां भडभडाट । कुवास व्योमीं दाटला
दिवाभीतांचे घंघाट । पिंगळियांचें किलकिलाट
भालु भुंकती सैराट । टिटवे थोर टिवटिवती

माधुर्य गुण.

मनाला द्रव आणून आल्हाद देणारी कविता, ती साधी असून ही तींत माधुर्य गुण असतो. कोमल पदरचना जाड्या समासाचा अभाव, सरल वर्णन, जेथें असतात तेथें हा गुण असतो.

वामनी श्लोक–इंद्रवज्रा.

शृंगार शृंगालय केसरी हो । सांगा अनंगा नटकेसरी हो
कासे विकासे पट केसरी हो । श्री शंकली पंकजकेसरी हो
अनंग रंगांबुधिच्या तरंगीं । रंगीं शुभांगी जडि अंतरंगीं
भंगील हा हो ! धनु केविं रंगीं । ह्मणे कुरंगी नयनी सुरंगी

श्लोक–मालिनी.

अलसलुलित मार्गी चालतां श्रांत झाली
दृढतर परिरंभा देउनी सांवरीली
मृदुलकमलतंतू तुल्य होता त्वदंगें
पडुनि हृदयिं माझ्या घेतली झोंप संगें

उत्तररामचरित्र.

—×—

छंद अथवा वृत्तें.

लक्षणें इ०

पद्यरूप काव्याच्या अक्षर नियमांला आणि मात्रा नियमांला छंद किंवा वृत्त ह्मणतात. संस्कृतांत छंदाच्या व्याख्या मोठ्या खुबीनें दिल्या आहेत. छंदाचें नांव, त्यांतील गणानुक्रम आणि तदंतर्भूत अक्षर संख्या आणि ऱ्हस्व दीर्घ वर्णक्रम हीं एका चरणांत संकलित करून दिलीं असतात; इतकेंच नव्हे तर तो चरणही त्याच छंदांत अथवा वृत्तांत रचून त्याचा लक्षणार्थ तसा उदाहरणार्थही उपयोग व्हावा अशी योजना केलेली असते. संस्कृताप्रमाणे ह्या सर्वही गोष्टी मराठींत एका चरणांत साधणें शक्य दिसत नाहीं. तथापि वृत्ताचें नांव, पदांतील अक्षर संख्या, व यति ह्मणजे विरामस्थानें आणि ऱ्हस्व दीर्घ अक्षरांचा क्रम हीं संकलित झाल्यास अवश्य तितकें ज्ञान होणार आहे ह्या दृष्टीनें लक्षणार्थ व उदाहरणार्थ ह्मणून एकेका छंदाचा-वृत्ताचा एकेक चरण रचून येथें दिला आहे. या योजनेनें चार ओळींचें कार्य एकच ओळ पाठ केली असतां होणार आहे. शिवाय गणांवरून छंदाची ओळख व्हावी आणि छंदांतील अक्षर गण सांगतां यावेत ह्मणून गणदर्शक दुसरा एक चरण जोडला आहे. आणखी सन्मान्य कवींच्या काव्यांतील उतारेही उदाहरणार्थ दिले आहेत.

लघु-गुरु.

ऱ्हस्व अक्षराला लघु आणि दीर्घ अक्षराला गुरु ह्मणतात. ऱ्हस्वाक्षरावर अनुस्वार असल्यास किंवा त्याच्या पुढें विसर्ग किंवा जोडाक्षर आल्यामुळें त्यावर आघात होत असल्यास तें दीर्घाक्षर समजलें जातें. तुह्मी या शद्बांतील तु या अक्षरावर जोर देऊन उच्चार होत असल्यास

तु हें दीर्घाक्षर होतें, नाहीं तर ऱ्हस्वच राहतें. भरंवसा या शद्वांतील र वरील टिंब अनुस्वाराचें नव्हे—अनुनासिकाचें आहे ह्मणून रं हें ऱ्हस्वाक्षर होय. दिसायाला (लिहिलेलें) जरी ऱ्हस्वाक्षर असलें तरी पुढें विसर्ग किंवा जोडाक्षर आल्यामुळें त्यावर आघात होऊन त्याचा उच्चार दीर्घाक्षराप्रमाणें करावा लागला ह्मणजे त्या ऱ्हस्वाक्षराला दीर्घत्व येतें. जनस्वभाव यांतील न हें दीर्घाक्षर समजावें.

लघु या शद्वाचा संक्षेप ल किंवा ला आणि गुरु ह्या शब्दाचा संक्षेप ग अथवा गा या अक्षरानें दर्शवितात. लघु किंवा ऱ्हस्वाक्षराची खूण ⏑ अशी आहे. गुरु किंवा दीर्घाक्षराची खूण — अशी आहे. लघु अक्षराची एक आणि गुरु अक्षराच्या दोन असा मात्रा विषयींचा नियम आहे. मात्रा ह्मणजे अक्षराचा उच्चार करण्यास जो काल लागतो तो.

अक्षर गण.

तीन अक्षरांचा एक गण होतो. अक्षरांच्या ऱ्हस्वदीर्घानुक्रमामुळें गणांचे आठ भेद झाले आहेत. त्यांचीं नांवें **न य र त म भ ज स** अशीं आहेत.

सर्व लघू तो **न** गण ह्मणावा	⏑	⏑	⏑
आद्य लघू तो **य** गण गणावा	⏑	—	—
मध्य लघू तो **र** गण वदावा	—	⏑	—
अंत्य लघू तो **त** गण पहावा	—	—	⏑
सर्व गुरू तो **म** गण ह्मणावा	—	—	—
आद्य गुरू तो **भ** गण गणावा	—	⏑	⏑
मध्य गुरू तो **ज** गण वदावा	⏑	—	⏑
अंत्य गुरू तो **स** गण पहावा	⏑	⏑	—

मात्रा गण.

चार मात्रांचा एक गण होतो. मात्रा गण एकंदर पांच आहेत.

म, भ, ज, स, न.

सर्व गुरू तो **म** गण ह्मणावा	–	–	–	=	४ मात्रा
आद्य गुरू तो **भ** गण गणावा	–	ᴗ	ᴗ	=	”
मध्य गुरू तो **ज** गण वदावा	ᴗ	–	ᴗ	=	”
अंत्य गुरू तो **स** गण पहावा	ᴗ	ᴗ	–	=	”
सर्व लघू तो **न** गण वदावा	ᴗ	ᴗ	ᴗ	=	”

छंदव्याख्या.

(व्याख्या चरणांतील संख्यावाचक शब्द छंदाच्या चरणांतील अक्षर संख्यांचे आणि यतिस्थलांचे वाचक [शब्द] होत.)

यतिस्थलांचे छंद.	अक्षरें	यति
१ अनिश्चित **अनुष्टुप्**	८	अंतीं
२ **प्रमाणिका** लघू गुरू । पदीं ज रा ल गा स्मरूं	८	”
३ आठांची ती **विद्युन्माला** । घेई मा–मा–गा–गा माला	८	”
४ पांच दुहेरी **चंपकमाला** । भा म स गा यां घेइ गणांला	१०	५–५
५ पंचमाँ यती घेइ **कामदा** । रा य जा ग हे येति तत्पदा	१०	५–५
६ यति सहावरी **शुद्धकामदीं** । गण न रा र ला गा हि तत्पदीं	११	६–५
७ घे **इंद्रवज्रा** यति पांच–साहीं । ता ता ज गा गा गण पादिं पाहीं	११	५–६

८ **उपेंद्रवज्रा** अकराक्षरांची । ज ता ज गा गा गण रीति जीची
११ अंतीं

९ हो आ अ हो वा **उपजाति** आद्य. ११ ”

१० **दोधक** घे अकरा पदिं वर्णा । तीन भ दोन ग हे क्रम जाणा
११ ”

११ घेइ वर्ण अकरा **रथोद्धता** । रा न रा ल ग गणांकिता मता
११ ”

१२ पंच सा अशीं **ललित** अक्षरें । रा ज सा ल गा क्रम पहा वरें
११ ५–६

१३ चारा साता घे पदीं **शालिनी** ती । पादीं तीच्या मा त ता गा ग येती
११ ४–७

१४ **स्वागता** पदिं धरीं अकरांतें । रा न भा ग ग असा क्रम तेथें
११ अंतीं

१५ घे **इंद्रवंशा** यति पांचव्यावरी । ता ता ज रा हे गण यत्पदांतरीं
१२ ५–७

१६ पदिं **तोटक** घे दश आणिक दो । गण चार स अन्य मुळीं न वदों
१२ अंतीं

१७ **द्रुतविलंबित** घे यति शेवटीं । न भ भ रा गण यत्पदिं राहती
१२ ”

१८ द्विषट्कीं यती घे **भुजंगप्रयात** । य कारेंच ज्याच्या असावें पदांत
१२ ६–६

१९ विराम **वंशस्थ** पदांत शेवटीं । ज ता ज रा हे गण जेथ राहती
१२ अंतीं

२० पांचा साहा घे पादिं ती **वैश्वदेवी** । मा मा या या हे चार जी नित्य सेवी १२ ५–७

२१ द्वादशीं यति तिज्यावर **यूथिका** । रा य भा र गण घेइ न आणिका
१२ ३–९
२२ पदिं दहा अधिक तीन **बिभावरी** । गण न भा ज ग ग हेच पदांतरीं
१३ ”
२३ येती **वसंततिलका** पदिं आठ साहा । ता भा ज जा ग ग असा क्रम तेथ पाहा १४ ८–६
२४ दीर्घ ऱ्हस्व दीर्घ ऱ्हस्व पंधरांत **चामरीं** । रा ज रा ज रा अशास ठावहीं पदांतरीं १५ अंतीं
२५ विरमति जरि आठीं सातवीं **मालिनी** ते । न न म य य गणांते जी पदीं वागवीते १५ ८–७
२६ लघू गुरू क्रमेंच षोडशांत **पंचचामर** । ज रा ज रा ज गा गणां जिथें सदैव आदर १६ अंतीं
२७ विराम प्रथमाष्टमीं मग नवींच **पृथ्वी** पदी । ज सा ज स य ला ग हे गण सदाहि येती पदीं १७ ८–९
२८ **मंदाक्रांता** चरणिं सतरा चार सा वर्ण सात । मा भा ना ता त ग ग गण हे नित्यही पाहि तेथ १७ ४–६–७
२९ धरीं वर्णा साहा अधिक अकरा ती **शिखरिणी** । य मा ना सा भाला ग सहित पदीं घेइ गणुनी १७ ६–११
३० सततहि सहा चारा साता पदीं **हरिणी** धरी । न स म र स ला गा यां घेई क्रमेंचि पदांतरीं १७ ६–४–७
३१ बारा आणिक सात वर्ण असती **शार्दूलविक्रीडितीं** । मा सा जा स त ता ग हा क्रम सदा पादीं तया पाहती १९ १२–७
३२ वर्णांचीं **स्रग्धरा** ते निजपदिं धरिते सप्तकें तीन पाहे । मा रा भा ना य या या सततहि गण हे सात त्यामाजि राहे २१ ७–७–७
३३ तीन सहा मग चार **उमा** पदिं बेविस वर्णचि घेइ असे । सात भकार हि गा मग हा गण संघ जयेप्रति सेवितसे २२ ६-६-६-४

३४ चारा पुढें तीन वेळा सहा वर्ण बेवीस **मंदारमाला** धरी । पादीं पहा सात ता त्यापुढें एक गा या क्रमा नित्य थारा करी २२ ४-६-६-६

३५ तीन सहा मग पांच असे पदिं तेविस वर्ण धरी **मदिरा** हे । सात भकार पुढें ग ग दोनचि हा क्रम नित्य पदीं धरिताहे २३ ६-६-६-५

३६ तीन सहा मग पांचचि तेविस वर्ण पादिं धरि नित्य **सवाई** । चार भरा न भ गा ग हि दोनचि नित्य हाचि चरणीं क्रम घेई २३ ६-६-६-५

३७ विषमीं दश अक्षरां गणी । समिं एकादश ती **वियोगिनी** १०—११ अंतीं

३८ बारा पहिल्या तिसऱ्या अठरा दुसऱ्या तशाच चवथ्याही । **गीति** पदीं घे मात्रा विश्रुत लोकांत **पंत–आर्या** ही

३९ नवा पुढती येतात दहा मात्रा । पदीं **दिंडी**चे मोज काव्यमित्रा

४० प्रमाणें कमी अधिक मात्रा । देऊनि आणी बळ गात्रां । वर्ण न गणी गुणसूत्रा । ओंवी **ज्ञान** कवी **मुक्त**

४१ न मोजी अक्षरा, घेई रसस्वाद, **अभंग** प्रसाद कवि**तुका**.

१ अनुष्टुप्.

अक्षरें ८; लघु गुरु अनिश्चित.

उदाहरणें.

श्लोक–वामनी.

मातेंचि मानुनी थोर । कर्मं सर्व समर्पिती
तरी अद्वैतयोगेंचि । मातें ध्याती उपासती

श्लोक–मोरोपंती.

सेवा करावया देवा । लावा हा योग्य चाकर
या तमाच्या शिरीं आत–पत्र हो तुमचा कर

२ प्रमाणिका.

अक्षरें ८; गण–ज, र, + ल, गा;

ल. उ. — प्रमाणिका लघू गुरु । पदीं ज रा ल गा स्मरूं

उदाहरण—श्लोक–रघुनाथ पंडित,

तया वनांत एकली । विलासिनी विलोकिली
मदें भरोनि डोलतो । तियेस हंस बोलतो

३ विद्युन्माला.

अक्षरें ८; गण–म, म, + गा, गा;

ल. उ. — आठांची ती विद्युन्माला । घेइ मा–मा–गा–गा–माला

उदाहरण—श्लोक नवीन

येतां जातां देतां घेतां । खातां किंवा झोंपी जातां
देवाजीच्या नामा घेई । काळाचेंही त्या भें नाहीं

४ चंपकमाला.

अक्षरें १०; यति ५–५; गण–भ, म, स + गा;

ल. उ. — पांच दुहेरी चंपकमाला । भा म स गा या घेइ गणांला.

उदाहरण—श्लोक नवीन.

कोण धनाची आणि जनाची । प्रीति जगीं हो ! ती नच साची
कीर्ति–यशाची त्याच परीची । प्रीति खरी ती एक हरीची

५ कामदा.

अक्षरें १०; यति ५–५; गण–र, य, ज; + गा;

ल. उ. — पंचमीं यती घेइ कामदा । रा य जा ग हे येति तत्पदा

उदाहरण—श्लोक—गोसावीनंदन

घोर हा नको फार कष्टलों । स्वार्थसाधनीं व्यर्थ गुंतलों
वारिं शीघ्र संसार–यातना । भो दयानिधे श्रीगजानना !

६ शुद्ध–कामदा.

अक्षरें ११; यति ६–५; गण–न, र, र, + ल, गा;

ल. उ. — यति सहा पुढें शुद्धकामदीं । गण न रा र ला गा हि तत्पदीं

उदाहरण—श्लोक–वामनी.

प्रगटलासि तूं नंद गोकुळीं । ह्मणुनि इंदिरा वास ये स्थळीं
सकळही सुखी या व्रजीं हरी । विरह दुःखिता गोपसुंदरी

७ इंद्रवज्रा.

अक्षरें ११; यति ५–६; गण–त, त, ज, + गा, गा;

ल. उ. — वे इंद्रवज्रा यति पांच साहीं । ता ता ज गा गा गण पादिं पाहीं

उदाहरण—श्लोक–वामनी.

प्रऱ्हाद हा विष्णु कुठार–दंड । दण्डप्रसंगीं असुरा उदंड
दैत्याचिया चंदन–काननाशीं । नाशील भेटोनि निरंजनाशीं

८ उपेंद्रवज्रा.

अक्षरें ११; यति पादांतीं; गण–ज, त, ज, + गा, गा;

ल. उ. — उपेंद्रवज्रा अकराक्षरांची । ज ता ज गा गा गण–रीति जीची

उदाहरण—श्लोक–वामनी.

चले वदेही वर दान देही । तथापि हा राघव दान देही
न देह हा भाग्य अहो जनाचें । विचित्र कर्तव्य निरंजनाचें

९ उपजाति.

अक्षरें ११; यति पादांतीं;

ल. उ. — आ हो अ हो वा उपजाति आद्य

उदाहरण—श्लोक वामनी.

तो बाप जो राघवभक्ति दावी । तशींच ते मायहि कीं वदावी
जो राम दावी गुरु तोचि साच । श्रुत्यर्थ इत्यर्थ असे असाच

१० दोधक.

अक्षरें ११; यति पादांतीं; गण–भ, भ, भ, + गा, गा;

ल. उ. — दोधक घे अकरा पदिं वर्णा । तीन भ दोन ग हा क्रम जाणा

उदाहरण—श्लोक नवीन.

पामर हा नर किंकर यातें । श्रीधर उद्धर दावि दयेतें
दावियली करितारणकार्जी । जी भगिनीस्तव त्या कुसमार्जी

११ रथोद्धता.

अक्षरें ११; यति पादांतीं; गण–र, न, र, + ल, गा;

ल. उ. — घेइ वर्ण अकरा रथोद्धता । रा न रा ल ग गणांकिता मता

उदाहरण—श्लोक वामनी.

मोकळा करुनि कंठ तेधवां । आठवूनि मनिं जानकी धवा
ते रडे भरतही तसा रडे । जोंवरी नयन होति कोरडे

१२ ललित.

अक्षरें ११; यति ५–६; गण–र, ज, स + ल, गा;

ल. उ. — पंच सा अशीं ललित अक्षरें । रा ज सा ल गा क्रम पहा बरे

उदाहरण—श्लोक नरहरि.

देवता मुनी नमिति सर्वदा । तूजवाचुनी कोण सर्वदा
ब्रह्मदेवही तुजसि वानितां । थोर पावला विबुध मान्यता

१३ शालिनी.

अक्षरें ११; यति ४–७; गण–म, त, त, + गा, गा;

ल. उ. — चारा साता जे धरी शालिनी ती
पादीं तीच्या मा त ता गा ग येती

उदाहरण—श्लोक नवीन.

काया वाचा इंद्रियें बुद्धि चित्त । यांनीं किंवा दुःस्वभावें प्रमत्त
जीं जीं केलीं जाणुनी नेणुनी वा । पापें म्यां तीं संहरीं देवदेवा !

१४ स्वागता.

अक्षरें ११; यति पदांतीं; गण–र, न, भ, + गा, गा;

ल. उ. — स्वागता पदिं धरी अकरातें । रा न भा ग ग असा क्रम जेथें

उदाहरण—श्लोक वामनी.

वृक्ष फार लवती फलभारें । लोंबती जलद घेउनि नीरें
थोर गर्व न धरी विभवाचा । हा स्वभाव उपकारपरांचा

१५ इंद्रवंशा.

अक्षरें १२; यति ५–७; गण–त, त, ज, र;

ल. उ. — घे इंद्रवंशा यति पंचमावरी । ता ता ज रा हे गण तत्पदांतरीं

उदाहरण—श्लोक नवीन.

देवाधिदेषा करुणानिधे हरी । संसारतापा अवघ्याहि संहरीं
माझे बहूही अपराध नाठवीं । सन्मंगला वत्सलता न आटवीं

१६ तोटक.

अक्षरें १२; यति पादांतीं; गण–स, स, स, स,

ल. उ. — पदिं तोटक घे दश आणिक दो
गण चार स अन्य मुळीं न वदो

उदाहरण—श्लोक वामनी.

वदना रदनावलिनें त्यजिलें । शिर सर्वहि शुभ्रपणें पिकलें
उठण्या बसण्या अणु शक्ति नसे । परि आस निरंतर वाढतसे

१७ द्रुतबिलंवित.

अक्षरें १२; यति पादांतीं; गण–न, भ, भ, र;

ल. उ. — द्रुतविलंबित घे यति शेवटीं । न भ भ रा गण तत्पदिं राहती

उदाहरण—श्लोक वामनी.

अलकहार गळ्यांतिल तोडिते । कुरळ केश मुखावरि सोडिते
करयुगें उर मस्तक ताडिते । वसन आणिक कंचुकि फाडिते

१८ भुजंगप्रयात.

अक्षरें १२; यति ६–६; गण–य, य, य, य;

ल. उ. — द्विषट्कीं यती घे भुजंगप्रयात
य कारेंच ज्याच्या असावें पदांत

उदाहरण—श्लोक वामनी.

प्रजा हाचि कीं वत्स भूधेनुकेचा । नृपा तूं करीं फार सांभाळ याचा
स्ववत्साचिया जाण वात्सल्ययोगें । अभीष्टार्थ देईल हे भूमि वेगें

१९ वंशस्थ.

अक्षरें १२; यति पादांतीं; गण–ज, त, ज, र;

ल. उ. — विराम वंशस्थ पदांत शेवटीं
ज ता ज रा हे गण तेथ राहती

उदाहरण—श्लोक वामनी.

वनीं रणीं शत्रु जलाग्नि संकटीं । महार्णवीं पर्वतवास दुर्घटीं
निजो बसो आणि फिरो अरण्यें । तया स्थलीं रक्षिति पूर्वपुण्यें

२० वैश्वदेवी.

अक्षरें १२; यति ५–७; गण–म, म, य, य;

ल. उ. — पांचा साता घे पादिं ती वैश्वदेवी
मा मा या या हे चार जी नित्य सेवी

उदाहरण—श्लोक नवीन.

देवा श्रीरामा सूर्यवंशावतंसा । विश्वेशा लक्ष्मीचित्तकासारहंसा
घ्यावीं नामें हीं ठाउकी एक रीती । देवा, केलीं स्यां पातकें संहरीं तीं

२१ यूथिका.

अक्षरें १२; यति ३–९; गण–र न भ र;

ल. उ. — द्वादशीं यति तिज्यावरि यूथिका
रा न भा र गण घेइ न आणिका

उदाहरण—श्लोक अनंत कवि.

दीर्घ रोदन वनीं लहु आयके । कोण गांजित असे मम अंबिके
वाण तीक्ष्णचि शितीं धनुर्षी करी । येउनी नमुनि बोलत सुंदरी

२२ विभावरी.

अक्षरें १३; यति पादांतीं गण–न भ ज ज + गा

ल. उ. — दहा अधिक तीन विभावरी
गण न भा ज ज ग हेंच पदांतरीं

उदाहरण—श्लोक अनंत कवि.

रुदन ते करितसे जनकात्मजा । कुमति ते उपजली काशि आत्मजा
तुरग बांधुनि जिवावरि ऊठला । पडतसे धरणिं होउनि व्याकुला

२३ वसंततिलका.

अक्षरें १४; यति ८–६; गण–त भ ज ज + गा, गा;

ल. उ. — येती वसंततिलकापदिं आठ साहा
ता भा ज जा ग ग असा क्रम तेथ पाहा

उदारण—श्लोक वामनी.

आकाश अंत न कळोनिहि अंतरिक्षीं । आकाश आक्रमति शक्त्यनुसार पक्षी
नामप्रतापहि यथामति ह्याच रीती । सीमा न पावति तथापि मुनींद्र गाती

२४ चामर.

अक्षरें १५; यति अंतीं; गण–र ज र ज र;

ल. उ. — दीर्घ ऱ्हस्व दीर्घ ऱ्हस्व पंधरांत चामरीं
राज राज रा अशांस ठावही पदांतरीं

उदाहरण—श्लोक नवीन.

सार कीं असार जन्म वाद हा नसे नवा
भक्तराज सांगती भजा सदाहि केशवा

सार तें असारही असार सारही घडे
वाद सोडुनी हरि स्मरा तराल रोकडे

२५ मालिनी.

अक्षरें १५; यति ८–७; गण–न न म य य;

ल. उ. — विरमति जरि आठीं सातवीं मालिनी ते
न न म य य गणांतें जी पदीं वागवीते

उदाहरण—श्लोक वामनी.

श्रवण हरि कथेचें कीर्तनीं गात जावें
स्मरण चरण सेवा अर्चनीं ही भजावें
नमन करुनि दास्यें सख्य आत्मार्पणातें
करिति तरति वाटे सार हें आपणांतें

२६ पंचचामर.

अक्षरें १६; यति अंतीं; गण ज र ज र ज + गा;

ल. उ. लघू गुरू क्रमेंच षोडशांत पंचचामर
ज रा ज रा ज गा गणां जिथें सदैव आदर

उदाहरण—श्लोक नवीन.

रमे खुळ्या जना धनें समर्पिशी अपार कां ?
सुशिक्षितां न देसि तीं समत्सरा तयींच कां ?
बुधास सर्व मानिती विमूढ होय बापुडें
तयीं कृपा करी ह्मणोनि मी सदोष का गडे ?

२७ पृथ्वी.

अक्षरें १७; यति ८–९; गण ज स ज स य + ल, गा;

ल. उ. विराम प्रथमाष्टमीं मग नवींच पृथ्वीपदीं
ज सा ज स य ला ग हा क्रम सदाहि पाहीं पदीं

उदाहरण—श्लोक मोरोपंती.

सुसंगति सदा घडो सुजनवाक्य कानीं पडो
कलंक मतिचा झडो विषय सर्वथा नावडो
सदंघ्रिकमळीं दडो मुरडितां हटानें अडो
वियोग धडतां रडो मन भवच्चरित्रीं जडो

२८ मंद्राक्रांता.

अक्षरें १७; यति ४–६–७ गण म भ न त त + गा, गा;

ल. उ. — मंदाक्रांता चरणिं सतरा चार सा वर्ण सात
मा भा ना ता त ग ग गण हे नित्यही पाहिं तेथ

उदाहरण—श्लोक (उत्तररामचरित्रांतील.)

हा ! हा ! देवी हृदय फुटतें देह माझा गळाला
वाटे शून्य त्रिभुवन मला अंतरात्मा जळाला
या आत्म्यानें किततरि सदा दुःखभारा भरावें
मोहव्यापी फिरफिरुनिया काय आतां करावें ?

२९ शिखरिणी.

अक्षरें १७; यति ६–११; गण य म न स भ, + ल ग;

ल. उ. — धरी वर्णा साहा अधिक अकरा ती शिखरिणी
य मा ना सा भा ला ग सहित पदीं घेइ गणुनी

उदाहरण—श्लोक वामनी.

अहो येतां जातां उठत बसतां कार्य करितां
सदा देतां घेतां वदनिं वदतां ग्रास गिळितां
घरीं दारीं शय्येवरि बहुसुखाचे अवसरीं
समस्तांची लज्जा त्यजुनि भगवच्चिंतन करीं

३० हरिणी.

अक्षरें १७; यति ६–४–७; गण न स म र स + ल, गा;

ल. उ. — सततहि सहा चारा साता पदीं हरिणी धरी
न स म र स ला गा या घेई क्रमेंच पदांतरीं

उदाहरण—श्लोक (उत्तररामचरित्रांतील.)

हृदय उलतें शोकें माझें नव्हे द्विविधा तरी
विकल करिते मूर्च्छा काया न जीवित संहरी
अंतुनि तनुसी भाजी ज्वाला न भस्म करीतसे
विधि जरि करी मर्मोद्भेदा न जीव हरीतसे

३१ शार्दूलविक्रीडित.

अक्षरें १९; यति १२–७ गण म स ज स त त + ग;

ल. उ. — बारा आणिक सात वर्ण असती शार्दूलविक्रीडितीं
मा सा जा स त ता ग हा क्रम तया पादीं सदा पाहती

उदाहरण—श्लोक वामनी.

वंशीं नाद नटीं तिला कटितटीं खोवोनि पोटीं पटीं
कक्षें वाम पुटीं स्वशृंग निकटीं वेताटि ही गोमटी
जेवी नीरतटीं तरूतळवटीं श्रीश्याम देहीं उटी
दाटी व्योमघटीं सुरा सुख लुटी घेती जटी धूर्जटी

३२ स्रग्धरा.

अक्षरे २१; यति ७-७-७; गण म र भ न य य य;

ल. उ. — वर्णांचीं स्रग्धरा ते निज पदिं धरिते सप्तकें तीन पाहे
मा रा भा ना य या या सतत हि गण हे सात त्यामाजि वाहे

उदाहरण—श्लोक मोरोपंती.

मी भक्ताधीन भक्तप्रिय मज न तसे आवडे अन्य काय
श्री जेथें सांन वाटे तदधिक मजला आपुला धन्य काय
माझी सेवाच मोक्षाहुनिहि बहुमता ज्यासि ते अंतराय
ध्यानीं होऊं न देती क्षणहि बहु मला मान्य ते संतराय

३३ उमा.

अक्षरें २२; यति ६-६-६-४; गण भ भ भ भ भ भ भ + गा;

ल. उ. — तीन सहा मग चार उमा पदिं बेविस वर्णचि घेइ असे
सात भकारहि गा मग हा क्रम नित्य जियेप्रति सोवितसे

उदाहरण—श्लोक आनंदतनय.

यापरिचे भवताप विमोचन चाप शरांकित भव्यमती
पाहुनि सर्व नृपाहुनि उत्तम लाहुनि तोष पुसे नृपती
कोण असे महिपालक बालक हे जगचालकसे सुचले
सांग मला सहृसागमनाशक चांग मनांत मला रुचले

३४ मंदारमाला.

अक्षरें २२; यति ४-६-६-६; गण त त त त त त त + गा;

ल. उ. — चारा पुढें तीन वेळां सहा वर्ण बेवीस मंदारमाला धरी
पादीं पहा सात ता गा पुढें एक ऐशा क्रमा नित्य थारा करी

उदाहरण—श्लोक मोरोपंती.

वाचाळ मी धीट पाचारितों नीट त्याचा न यो वीट साचा हरी
खोटा जरी मीच खोटा मधें तूंच मोठा कृपेचा न तोटा धरी
दाता सुखाचा सदा तारिता आपदा ताप दे एकदा तापटीं
या संतसे व्हावया संपदा हे भया संग नाशील या संकटीं

३५ मदिरा.

अक्षरें २३; यति ६-६-६-५; गण भ भ भ भ भ भ भ + गा, गा;

ल. उ. — तीन सहा मग पांच असे पदिं तेविस वर्ण धरी मदिरा हे
सात भकार पुढें ग ग दोनचि हा क्रम नित्य पदीं धरिताहे

उदाहरण—श्लोक वामनी.

नम्रपणेंचि महोन्नत जे गुण वर्णुनिया परकीय जनाचे
सांगितल्याविण दावित कौशल सर्वजनांप्रति जे स्वगुणांचें
स्वार्थ परार्थहि साधिति जिंकिति शांतिबळें मुखरत्व खळांचें
संत महाद्भुत भाजन यापरि सेवन कोण करी न तयाचें

३६ सवाई (मदिरा)

अक्षरें २३; यति ६-६-६-५; गण भ भ भ भ र न भ + गा, गा;

ल. उ. — तीन सहा मग पांचचि तेविस वर्ण पादिं धरि नित्य सवाई
चार भ रा न भ गा ग हि दोनचि नित्य हेचि चरणीं गण घेई

उदाहरण—सवाई–मोरोपंती.

राम रघूत्तम काम रिपु प्रिय लोक शोक हर यापरि भावें
दाशरथे तुज होउनिया पादिं लीन दीन जन बंधुसि गावें
आमरण स्मृति हेंचि असो वय साच साच सुपथांत सरावें
दे वरदा वर या शरणाप्रति पाप ताप जलधीस तरावे

३७ वियोगिनी.

ल. उ. — विषमीं दश अक्षरा गणी । समिं एकादश ती वियोगिनी

उदाहरण—श्लोक नवीन.

पतिजीवसखा नसे घरीं । न कळे येइल केधवां तरी
मजला गृह शून्य वाटतें । विरहें मन्मय फार पोळतें

मात्रा-वृत्तें.

(ऱ्हस्वाक्षराची एक व दीर्घाक्षराच्या दोन मात्रा हें पूर्वीं सांगितलें आहे.)

आर्या.

आर्या वृत्ताचे मुख्य पांच प्रकार आहेतः—

१ आर्या	प्र. च. मा.	१२	द्वि. च. मा.	१८	तृ. च. मा.	१२	च. च. मा.	१५
२ गीति	”	१२	”	१८	”	१२	”	१८
३ उपगीति	”	१२	”	१५	”	१२	”	१५
४ उद्गीती	”	१२	”	१५	”	१२	”	१८
५ आर्यागीति	”	१२	”	२०	”	१२	”	२०

या पैकीं दुसरा प्रकार गीति हाच मोरोपंती आर्या ह्मणून विश्रुत आहे.

ल. उ.-बारा पहिल्या तिसऱ्या, अठरा दुसऱ्या तशाच चवथ्याही
गीति पदीं घे मात्रा, विश्रुत लोकांत पंत आर्या ही

३८ मोरोपंती आर्या-गीति.

संस्कृत प्राकृत मिश्रित यास्तव कोणी ह्मणेल ही कंथा
भवशीतभीतिभीता स्वांताला दाविला बरा पंथा
नारायणनामानें, नच सोडावें कदापि हें वदन
मेल्याही लोभ्याच्या, चित्तीं सोडूं नये जसें सदन

३९ साकी.

१६+१२ मिळून २८ मात्रा आहेत अशा दोन अर्धांची एक साकी होते.

मोरोपंत.

भक्तें प्रेमें अणुही दिधलें, तें मज पुष्कळ होतें
बहुहि अभक्तें समर्पिलें , परि अल्पचि भासे होतें

४० दिंडी.

प्रत्येक चरणांत ९ + १० मिळून १९ मात्रा असतात.

ल. उ. — नवापुढती येतात दहा मात्रा
पदीं दिंडीचे मोज काव्यमित्रा

रघुनाथ पंडित.

चौगुणीनें जरि पूर्ण शीत भानू
नळाऐसा तरि कळानिधी वानूं
प्रतापाचा जो न मावळे भानू
तया सारीखा कोण दुजा मानूं

४१ ओंवी.

या वृत्तांत वर्ण आणि मात्रा संख्या अनियमित आढळते.

प्रमाणें कमी अधिक मात्रा । देऊनि आणी वळ गात्रां
वर्ण न गणी गुणसूत्रा । ओवी ज्ञान कवी मुक्त

ज्ञानेश्वर.

तरी अदंभित्व ऐसें, लोभियाचें मन जैसें,
जिवु जावो परी तुमसे, ठेविला ठावो ॥ १ ॥
परोपकार न बोले, न मिरवी अभ्यासिलें,
न शके विकूं जोडिलें, स्फीतीसाठीं ॥ २ ॥

मुक्तेश्वर,

काम असावा ईश्वर भजनीं । क्रोध असावा इंद्रिय दमनीं
तीर्थ-प्रसाद-शेष-ग्रहणीं । लोभ अपार असावा ॥ १ ॥
मोह असावा सज्जनासीं । मद असावा दुर्जनासीं
मत्सर सदा संसारासीं । असावा तो कीं ॥ २ ॥

श्रीधर

दोन्ही दाढा एकचि स्वर । एक पाहणें दोन नेत्र
कीं दों पात्रांत पवित्र । एकचि दुग्ध घातलें ॥ १ ॥

गीर्वाण हे शशिमंडल अद्भुत । त्याची प्रभा हें प्राकृत
संस्कृत ग्रंथ वर्णिती पंडित । अर्थ प्राकृत करिती पैं ॥ २ ॥

४२ अभंग.

न मोजी अक्षरा, घेई रसस्वाद, अभंग प्रसाद कवतुका
तुकारामाचे.

(१)

जगाच्या कल्याणा संताच्या विभूती, देह कष्टवीती उपकारें
भूतांची दया हें भांडवल संता, आपुली ममता, नाहीं देहीं
तुका ह्मणे सुख पराविया सुखें, अमृत हें मुखें स्रवतसे

(२)

पंढरीस जावें, जीवन्मुक्त व्हावें, केशवा भेटावें, जीवलगा
जन हे सुखाचे, दिल्या घेतल्याचे, वा अंतःकाळींचें, नाहीं कोणी

(३)

जरी व्हावा तुज देव । तरी हा सुलभ उपाव
करीं मस्तक ठेंगणा । लागे संताच्या चरणा

(४)

पुढें आतां कैंचा जन्म । ऐसा श्रम वारेसा
पांडुरंगा ऐशी नाव । असतां भाव तारील

रसानुकूल छंद-योजना.

शृंगारः— इंद्रवज्रा, उपेंद्रवज्रा, द्रुतविलंबित, पृथ्वी, मालिनी, मंदाक्रांता, वसंततिलका, शार्दूलविक्रीडित, शिखरिणी, हरिणी.

वीर (रौद्र):— इंद्रवज्रा, उपेंद्रवज्रा, रथोद्धता, वंशस्थ, शार्दूलविक्रीडित, शिखरिणी, स्रग्धरा, हरिणी.

करुण (शोक):— द्रुतविलंबित, मालिनी, मंदाक्रांता, इत्यादि.

अद्भुतः— इंद्रवज्रा, वसंततिलका, शार्दूलविक्रीडित, शालिनी, स्वागता.

हास्य (बीभत्स):— तोटक, दोधक, भुजंगप्रयात, रथोद्धता, वंशस्थ, शार्दूलविक्रीडित, स्रग्धरा.

भयानकः— शार्दूलविक्रीडित, स्रग्धरा.

वत्सल-शांत-भक्तिः— यांस विशेषतः अनुकूल अशीं मंदाक्रांता, मालिनी, शार्दूलविक्रीडित, द्रुतविलंबित, इत्यादि.

———×———

अलंकार.

काव्यास शोभा देणाऱ्या शद्वरचनेस आणि अर्थरचनेस **अलंकार** मानिलें आहे. शद्वरचनेच्या योगें शोभा देणारे ते शद्वालंकार आणि **अर्थ रचनेच्या** योगें शोभा देणारें तें अर्थालंकार.

शद्वालंकाराचे मुख्य भेद तीन आहेत, अनुप्रास, यमक व श्लेष.

१ अनुप्रास.

एका व्यंजनाची आवृत्ति झाली असतां ह्मणजे तेंच तें व्यंजन **पुनः पुनः** आलें असतां **वृत्यनुप्रास** होतो.

उदाहरण–श्लोक वामनी (वनसुधेंतील)

वंशीं नादनटी तिला कटितटीं खोवोनि पोटीपटीं
कक्षे वामपुटीं स्वश्रृंगनिकटीं वेताटिही गोमटी
जेवीं नीरतटीं तरूतळवटीं श्रीश्यामदेहीं उटी
दाटी व्योमघटीं सुरासुख लुटी घेती जटी धूर्जटी

येथें ट् ह्या व्यंजनाची आवृत्ति कितीतरी केली आहे.

जेथें अनेक व्यंजनांची आवृत्ति साधली असते तेथें **छेकानुप्रास अलंकार** होतो.

उदाहरण–श्लोक–वामनी (गजेंद्र मोक्षांतील)

नसे ठावा ब्रह्मा न शिव अथवा श्रीपति हरी
हरी जो तापातें उचलुनि कृपासिंधुलहरी
हरी वाटे काळा करिस विपती मृत्युभुजगा
जगाचा तूं ऐसा धनि कवण तो पाव मज गा

येथें व्–त्–प् इत्यादि व्यंजनांची आवृत्ति कशी साधली आहे पहा.

जेथें शद्वासहित अर्थाची आवृत्ति झाली असते तेथें **लाटानुप्रास अलंकार** होतो.

उदाहरण–श्लोक–आनंदतनयकृत (सीतास्वयंवरांतील)

जो कल्याणगुणी गुणीच अगुणी भूतें मणी ज्या गुणी
ज्याच्या रूपगुणीं सदा गुणगुणी शंभू निघे निर्गुणी
सृष्टी चित्त गुणीं जयास्तव गणी माया जया ठँगणी
तो कोणा न गणी वसे ऋषिगणीं श्रीराम रंगांगणीं.

येथें गुणी, गणी यांची आवृत्ति झाली आहे.

कंठ्य तालव्यादि स्थानांपैकीं कोणत्याही एकाच स्थानाचीं अनेक अक्षरें अनेक वेळां आलीं असतां **श्रुत्यनुप्रास** होतो.

उदाहरणः–श्लोक (उत्तर रामचरित्रांतील)

अलसललित मार्गीं चालतां श्रांत झाली
दृढतर परिरंभा देउनी सांवरीली
मृदुल कमलतंतू तुल्य होतां त्वदंगें
पडुनि हृदयिं माझ्या घेतली झोंप संगें

प. गोडबोले

२ यमक

अक्षराची ह्मणजे केवळ स्वराची अथवा स्वरयुक्त व्यंजनाची आवृत्ति झाली असतां यमकालंकार होतो. दोन चरणाच्या शेवटीं यमक असतें त्यास **अंत्ययमक** ह्मणतात. अंत्य यमक निर्दोष साधावयाचें असेल तर ज्या अक्षरांचें यमक साधावयाचें आहे तीं एकच का–का (का–खा नव्हे) असलीं पाहिजेत, शिवाय त्यांच्या पूर्वींचा स्वर एकच असला पाहिजे. ता का हा का (तो का–हा का नव्हे) आणखी यमकांचा शद्व भिन्नार्थ दाखविणारा पाहिजे. (नको–नको नव्हे) नल गे न लगे. हें यमक वाढतां वाढतां सारा चरणही व्यापून टाकितें, तेव्हां त्याला **चरणयमक** हें विशिष्ट नाम प्राप्त होतें.

उदाहरणः–श्लोक आनंदतनयकृत (विश्वामित्राभिगमनांतील)

पायां नमीं देइन वंश सारा
पा यां न मीं दे इनवंशसारा
न या वयामाजि भला जना दे
न यावया मा जिभ लाज ना दे

जसें चरणाच्या अंतीं यमक असतें, तसें आरंभींही साधतात, त्याला **आद्ययमक** ह्मणतात.

उदाहरणः–आर्या मोरोपंती

हार विलासवतीनें केला हा लक्ष्मणप्रसूनें कीं
हारविला सवतीनें क्षितिनें पुजिला सुरप्रसूनें कीं

कवितेचें पहिलें व दुसरें अशीं दोनहीं अर्धे अभिन्न रचून क्वचित् आद्यंत यमक साधलें असतें, त्याला **पूर्णयमक** ह्मणतात.

उदाहरणः–मोरोपंती आर्या.

अनल समीहित साधी राया वारा महीवरा कामा
अनलस मीहि तसा धीरा यावा रामही वराका मा

दोन चरणांला अथवा दोन अर्धांना दामाप्रमाणें जोडणारें तें **दामयमक** ह्मणून समजावें.

उदाहरणः–मोरोपंती आर्या.

सेवुनि संतत पाला, संत तपाला यदर्थ करितात
तो प्रिय यास्तव नाकीं, यास्तव नाकींहि हेंचि वरितात

यमक जणूं काय धांवत आहे असा भास उत्पन्न करितें तें **अश्वधाटी यमक** होय.

उदाहरणः–मोरोपंती आर्या.

वाजत गाजत साजत आज तया जतन करुनि आणा हो
मज मागुनि मत्स्यांचा हा रिपुशिशुबाहुराहु राणा हो

प्रतिस्थानीं यमक असल्यास त्यास **पुष्पयमक** ह्मणतात.

उदाहरणः—मोरोपंती श्लोक.

कितेक रथ मोडिले ध्वज कितेक ही तोडिले
कितेक शर सोडिले गज कितेकही झोडिले
असंख्य भट ताडिले यमपुराकडे धाडिले
शिरःप्रकर पाडिले बहुत यापरी नाडिले

पद्याचा दुसरा आणि चवथा चरण एकरूप असल्यास **संदष्टकयमक** होय.

उदाहरणः—मोरोपंती आर्या

साधु ह्मणावें ह्मणती नर माधवदास साधु याला जे
अतिसारीं पट ज्याचें न रमाधव दाससा धुया लाजे

कोणत्याही चरणांत तींच अक्षरें शेजारीं शेजारीं आलीं असतां **संयुतावृत्ति यमक** होतें.

उदाहरणः—श्लोक वामनी.

गजगती जगतीप्रति दाविते
वसुमती सुमती सुख भाविते
स्वतनुजा तनु जाणतसे धरा
नवरि ते वरिते मणिकंधरा

चारही ओळी सारख्या असल्यास **पंक्ति यमक** होतें.

कीर्तनासि नर हो ! तुह्मि जागा ॥ जागा ह्मणजे **स्थळ**
कीर्तनासि नर हो ! तुह्मि जागा ॥ जागा ह्मणजे **जागे रहा**
कीर्तनासि नर हो ! तुह्मि जा, गा ॥ जा आणि गा.
कीर्तनासि नर हो ! तुह्मी जा, गा ! ॥ गा नर हो ! जा. **(बाप हो)**
शंकरासि पुजिलें सुमनानें ॥ 'सुमन' नांवाच्या पुरुषानें
शंकरासि पुजिलें सुमनानें ॥ शुद्ध चित्तानें
शंकरासि पुजिलें सुमनानें ॥ कुसुमानें—पुष्पानें
शंकरासि पुजिलें सुमनानें ॥ सु—चांगलें शुद्ध आहे चित्त त्यानें

३ श्लेष

एकाच पदाचे शब्द न तोडतां अथवा शब्द तोडून अनेक अर्थ साधले असतां **श्लेष** अलंकार होतो; जसें:-

अभंग श्लेषः-अंबर ह्या पदाचे आकाश व वस्त्र असे अर्थ साधणें.

सभंग श्लेषः-अगद हा शब्द तोडून अगद-औषध आणि अ-नाहीं, गद-रोग-निरोगी, असें अर्थ साधणें.

अर्थालंकार

अर्थालंकार अनेक आहेत, त्यांतील मुख्यमुख्यांचीं नांवें लक्षणें आणि उदाहरणें येथें वर्णानुक्रमानें सांगितलीं आहेत.

अतिशयोक्ति

वर्णनांत, भेदाच्याठायीं अभेद, अभेदाच्याठायीं भेद, संबंधाच्याठायीं असंबंध, असंबंधाच्याठायीं संबंध, अथवा अयथार्थ कार्यकारणक्रम निर्दिष्ट असतो ह्मणजे कारणाआधीं कार्य घडलें, अथवा नंतर होणारें कार्य प्रथम झालें किंवा कार्यकारण एकाच वेळीं घडलीं असें वर्णन असतें तेथें **अतिशयोक्ति** अलंकार होतो.

उदाहरणः-आर्या-मोरोपंती. (कर्णोक्ति)

श्रीरामें हा रथ मज दिधला यावरुनि पार्थ मारीन
तद्रक्षणासि अंतक आला तरि मी तयास वारीन
हा शिष्य वसिष्ठासी भृगुरामासीहि सम न वेदांत
शास्त्रांत उणा, आधीं या आले वेद, मग नवे दांत

श्लोक-रघुनाथ पंडित.

जो अंबरीं उफळतां खुर लागताहे
तो चंद्रमा निजतनूवरि डाग लाहे
जो या यशास्तव कसें धवलत्व नेघे
श्रृंगारिला हय तयावरि भूप वेंघे

कदा नेणों वोढी शरधितुनि काढी शर कदा
कदा धन्वी जोडी वरिवरिहि सोडी शर कदा
विपक्षाच्या वक्षावरि विवर लक्षास्तव रणीं
कळे राजेंद्राची त्वरित शरसंधानकरणी

७ अधिक

कार्य निष्पत्तीची सामुग्री पूर्ण असूनही कार्य होत नाहीं ह्मणून उपरोध पर वर्णन असतें तेथें **अधिक** अलंकार होतो.

उदाहरणः–आर्या मोरोपंती

ज्या उदरांत सकलही लोकत्रय सावकाश राहतसे
त्यांतचि मुनिवरदर्शन होतां आनंद तो न मावतसे

श्लोक–शार्दूलविक्रीडित.

पृथ्वी विस्तृत ही परी उदधि हा राहे तिला वेष्टुनी
त्यातें ही उदरीं धरी मुनि परी तोही नभीं चांदणी
तें आकाश अफाट विष्णुचरणीं अत्यल्पता पावलें
त्या विष्णूसहि ठेविसी हृदिं बुधा वंदूं तुझीं पावलें

८ अनन्वय

जेथें तुझ्यासारखा तूंच अशाप्रकारें ज्याची उपमा त्यालाच दिल्याचें वर्णन असतें तेथें **अनन्वय** अलंकार होतो. [हा उपमा अलंकाराचा प्रकार आहे. उपमेयाचा उत्कृष्ट धर्म केव्हां उक्त तर केव्हां लुप्त असतो.]

उदाहरणः–श्लोक वामनी

घडे दैवें किंचित् कलुष परि संतापति मनीं
अशांतें ताराया असति बहु तीर्थें त्रिभुवनीं
जया प्रायश्चित्तें नसति कुनरां दे गति अशी
समर्था या लोकीं तुजसम अये तूंचि असशी

उदाहरणः—मोरोपंती केका

अतर्क्य महिमा तुझा गुणहि फार बा हे विधी
श्रुतिज्ञहि ह्मणे सदा स्तविल आमुची केविं धी
तरी जन यथामती स्तवुनि जाहले सन्मती
स्तवार्थ तुझिया तुझ्यासम कवी कधीं जन्मती ?

७ अनुमान

जेथें साधनांवरून साध्याचें ज्ञान अनुमित तर्कानें काढलें असतें तेथें **अनुमान** अलंकार होतो.

उदाहरणः—श्लोक मोरोपंती

भवन्मतिस आवडे जरि, तरी धनालागिं तें
मदीयगुणकीर्तनश्रवण का तरी त्यागितें ?
असेंहि ह्मणशील बा ! जरि तरी तुझी सावली
तुला त्यजुनि पाजितां, काशि कुधाकडे धावली

८ अनुषंग

जेथें एका क्रियेपासून अनेक कार्यासिद्धि झाल्याचें वर्णन असतें तेथें **अनुषंग** अलंकार होतो.

उदाहरणः—मोरोपंती केका

छळी नृप बळी बळी तरिच तो नसे आढला
गमे बहु भला भला न, सकळांसही बाढला
परीक्षक करी तसें जडहि सोशिते हेमही
न केवळ विरोचनात्मज, तरे पदें हे मही

९ अनुज्ञा

जेथें दोषाला गुण मानून त्याचा अंगिकार वर्णिला असतो तेथें **अनुज्ञा** अलंकार होतो.

उदाहरणः–तुकारामाचा अभंग.

गुण गाईन आवडी। हेंचि माझी सर्व जोडी॥
तुका ह्मणे गर्भवासी। सुखें घालावें आह्मांसी॥

उदाहरणः–मोरोपंती–केका

कराल पुरती दया तरि असो दिलें पावलें
परंतु हरि एकदा त्वरित दाखवा पावलें
प्रसाद करणें मनीं जरि नसेल हें आंवरा
जया बहु तयास द्या मज कशास मी हावरा

१० अपन्हुति

हें औषध नव्हे अमृत आहे अशा प्रकारें उपमेय उपमान असल्याचें वर्णन असतें तेथें **अपन्हुति** अलंकार होतो. [हा उपमा अलंकाराचा **प्रकार** यांत नकारार्थक शब्द असतो, कधीं नसतो.]

उदाहरणः–श्लोक

न हें नभोमंडल वारिराशि॥ न तारका फेंसचि हा तयासी
न चंद्रमा नांवचि चालताहे॥ न अंक तो तीवर शीड आहे
संताप दे यास्तव चंद्र नोहे॥ रवी ह्मणावा तरि रात्र आहे
हा सागरांतून निघून गेला॥ आकाशमार्गी वडवाग्नि ठेला

अप्रस्तुत प्रशंसा (अन्योक्ति)

डोळ्यासमोर नसलेलेल्या गोष्टीच्या वर्णनानें डोळ्यापुढें असलेल्या गोष्टीची समज जेथें घालून दिली असते तेथें अप्रस्तुत प्रशंसा अथवा **अन्योक्ति** अलंकार होतो. (कार्यावरून कारणाचें वर्णन, कारणावरून कार्याचें वर्णन, सामान्यावरून विशेषाचें वर्णन, विशेषावरून सामान्याचें वर्णन, हीं अन्योक्तीचीं अंगें होत.)

उदाहरणें मोरोपंती आर्या.

द्वारीं मृगपतिहस्तांतून अहो वीरराय जी मुक्ता
तो सेविजेल इतरें सिंहावांचून काय जी मुक्ता

ती सुमति ह्मणे ताता न त्यजुनि पयोधिला नदी परते
न पतंगचित्तवृत्ति क्षणही रत्नीं त्यजून दीप रते.

श्लोक–शार्दूलविक्रीडित

आहे एक सुगंध मात्र जवळीं तो त्यास राखावया
ऐसे घोर भुजंग पाळिसि जना जे धावती खावया
येतीं गोड फळें फुलेंहि बरवीं दैवें तुला चंदना
त्यांच्या वा करितास काय न कळे संरक्षणा योजना.

कृ. चिपळूणकर

१२ अर्थांतरन्यास.

सामान्य आणि विशेष अशा दोन्ही अर्थांचें साधर्म्यावरून अथवा वैधर्म्यावरून एकाच वेळीं कथन असतें--एखादी विशेष गोष्ट सांगून तिचें समर्थन एखादी सामान्य गोष्ट सांगून केलें असतें--तेथें **अर्थांतरन्यास** अलंकार होतो.

उदाहरणें--श्लोक–रघुनाथ पंडित.

तदितर खग भेणें वेगळाले पळाले
उपवनजलकेली जे कराया मिळाले
स्वजन गवसला जो त्याजपाशीं नसे तो
कठिण समय येतां कोण कामास येतो ?

मोरोपंती--केका

पदाब्जरज जें तुझें सकलपावनाधार तें
अघाचलहि तारिले बहु तुवांचि राधारतें
अजामिळ अघासुर ब्रजवधू बकी पिंगळा
अशां गति दिली उरे न तृण भेटतां इंगळा.

श्लोक–शालिनी

सिंहाचा जो बाल तोही चपेटा । मारी त्याला जो करी मत्त मोठा
तेजस्वी जे वृत्ति ऐशी तयांची । तेथें कांहीं चाड नाहीं वयाची.

१३ असंगति

चोर गेला संन्याशी सांपडला अशा प्रकारें कारणाचा व्यापार एका-स्थळीं आणि कार्याचा व्यापार दुसरे स्थळीं अशी वर्णनयोजना असते तेथें **असंगति** अलंकार होतो.

उदाहरणें–मोरोपंती आर्या

पांडव जेवुनि आधीं मग राक्षस जीवितासी आंचवला
सन्मणि न कोटि लक्षा ये येतो काय राक्षसा चवला ?
हार विलासवतीनें केला हा लक्ष्मण प्रसूनें कीं
हारविला सवतीनें क्षितिनें पुजिला सुरप्रसूनें कीं.

१४ असंभावना

जेथें असंभाव्यतापर वर्णन असतें तेथें **असंभावना** अलंकार होतोः– उंदिरानें मांजर मारावें अशा प्रकारचें हें कृत्य होय.

उदाहरण–मोरोपंती आर्या

गज गोष्पदीं बुडाला हा दैवा सिंधु शोषिला सशकें
न शके सोसाया हें वधिला तो केसरी कसा मशकें ?

१५ आशी

जेथें आशिर्वादात्मक वर्णन असतें तेथें **आशी** अलंकार होतो.

उदाहरण–मोरोपंती केका.

असोत तुज आमुचीं सकल भावुकार्यबळें
जगीन बहु काय म्यां सुकृत जोडिलें दुर्बळें
असें प्रियसख्या सुखी बहुतकाळ मायातमीं
जना सुपथ दाखवीं मुदित सत्तमा यांत मी.

१६ आक्षेप

एकादा आक्षेप घेऊन तो खोडून टाकल्याचें वर्णन असतें तेथें **आक्षेप** अलंकार होतो. बोलावयाचें तें अर्धवट बोलून एखादा विशेष अभिप्राय व्यक्त केला असतो तेथेंही हा अलंकार होतो.

उदाहरणें–मोरोपंती केका

तसाचि उरलों कसा? पतित मी नसें काय कीं
कृपाचि सरली असेंहि न घडे जगन्नायकीं
नसेन दिसलों कसा नयनसर्वसाक्षी रवी
विशाद धरिला ह्मणों न सुरभी विषक्षीर वी.

श्लोक–शार्दूलविक्रीडित

माझें जीवित लाडके! ह्रदय तूं आहेस वाटे मला
तूं ज्योत्स्ना नयना तनूवरि सुधाचर्चा जणों शीतला
त्या वेडीस सदा अशा सुखवुनी मोदप्रदें भाषणें
तींतें त्वां अदये-कशास पुढचें बोलूं तरी बोलणें.

प. गोडबोले

१७ उत्प्रेक्षा

उपमेय तेंच जणूं काय उपमान आहे असें वर्णन असतें तेथें **उत्प्रेक्षा** अलंकार होतो. हा अलंकार साधण्याकरितां कीं, कीं काय, जणूं, जणूं काय, जाणों, जसें काय, गमे, वाटे, भासे, असे शद्ब वापरतात किंवा अध्याहृत असतात. हा उपमा अलंकाराचा प्रकार आहे.

उदाहरणें–दिंडी (रघुनाथ पंडित)

असे बोलोनी नळें रंजवीला । अंजुळीमाजी हंस बैसवीला
गमे चंपककुसुमौघहार झेला । पाठवाया युवतीस सिद्ध केला.

मोरोपंती केका

किती श्रवण झांकती प्रभुहि काय ते पोळती?
पुसाल तरि कोण ते पदरजीं तुझ्या लोळती
बरें तुजचि सोसवे स्तवन कृत्तिवासा गरा
न पी तरि कसें घडे हितकरा दयासागरा!

मोरोपंती आर्या

समरीं मत्त मतंगज कीं दोघे व्याघ्र कीं मृगाधिपति
कीं वृष कीं घन कीं ग्रह कीं नग कीं अंधकस्मरारति.

टीप-स्वरूपोत्प्रेक्षा, हेतूत्प्रेक्षा, फलोत्प्रेक्षा असे या अलंकाराचे प्रकार आहेत. (उत्प्रेक्षित वस्तु पदार्थ असेल तर १ ला, क्रियेचें कारण असेल तर २ रा, आणि क्रियेचें फळ असेल तर ३ रा प्रकार.)

१८ उदात्त

जेथें समृद्धिपर प्रौढ (ऐश्वर्याचें वैभवाचें) वर्णन असतें तेथें **उदात्त** अलंकार होतो.

मोरोपंती केका

जगद्‌गुरु महेश्वर प्रभुशिरीं जिचें नांदणें
जिच्या जळमळें तुळे न शरदिंदुचें चांदणें
प्रजा हरिहरा अशा यदुदरीं अनेका कवी
भिऊनि ह्मणतील कीं जशि सुधा तशी काकवी.

१९ उपमा

दोन वस्तूंचें साम्य-साधर्म्य जेथें वर्णिलें असतें तेथें **उपमा** अलंकार होतो. ह्याचे अनेक प्रकार आहेत; उत्प्रेक्षा, संदेह, भ्रांतिमान्, अपन्हुति, रूपक, रूपकातिशयोक्ति, अनन्वय, व्यतिरेक, निदर्शना इत्यादि अलंकार वस्तुतः **उपमा** अलंकाराचेच प्रकार होत. ह्याशिवाय पूर्णोपमा, लुप्तोपमा, प्रतिवस्तूपमा, वाक्योपमा आणि मालोपमा हे ह्या अलंकाराचे आणखी भेद आहेत. हा अलंकार सर्व अलंकारांचा जीवात्मा ह्मणून मानला आहे.

पूर्णोपमा-उपमेय, उपमान, साधर्म्यदर्शक शद्ब आणि उपमादर्शक शद्ब या चार गोष्टी जेथें यथार्थ गोंवित्या असतात तेथें **पूर्णोपमा** अलंकार होतो.

उदाहरणें-श्लोक-रघुनाथ पंडित

जो धैर्यें धरसा सहस्रकरसा तेजें तमादूरसा
जो रत्नाकरसा गभीर सुरसा भूपां यशोहारसा
ज्ञाता जो सरसावला नवरसांमाझारि श्रृंगारसा
शोभे तामरसाक्ष तो नळ रसानाथ स्तवूं फारसा.

मोरोपंती–केका

कळी करि सुनिर्मळीं परम उग्र दावा नळीं
तयांत अविशुद्ध मी शलभ जेविं दावानळीं
व्रणार्थ पशुच्या शिरावरि वनीं उभे काकसे
स्मरादि रिपु मन्मनीं, अहि न काळ भेका कसे?

श्लोक–वामनी

वसे मानसीं देव तो जाण ऐसा
नभाचे परी व्यापकू पूर्ण तैसा
सदानंद तो जात वा येत नाहीं
तयावीण कोठें रिता ठाव नाहीं.

लुप्तोपमा–पूर्णोपमेंत सांगितलेल्या चार गोष्टींपैकीं एक अथवा अधिक गोष्ट स्पष्टपणें सांगितली नसली कीं **लुप्तोपमा** अलंकार होतो.

उदाहरण–मोरोपंती आर्या

दुर्योधन दुःशासन कर्ण कृप द्रोण भीष्म ज्या कटकीं
त्यांत मरेनचि शिरतां कांड्यावरि घालितां चिरे पट कीं.

प्रतिवस्तूपमा–उपमानदर्शक 'सारखें' इत्यादि शब्द न घालितां साम्य केवळ उपमानानेंच दाखविलें असतें तेथें **प्रतिवस्तूपमा** अलंकार होतो.

उदाहरण–मोरोपंती–आर्या

नररत्न तोचि, तूंचि स्त्रीरत्न उदंड आडनांवांची
न बुडविति न वा तारिति चित्रें बरवींहि आड–नांवांचीं.

श्लोक–रघुनाथ–पंडित

घोडे कधीं न खळती रविच्या रथाचे
उल्लंघिती पवन मार्ग सदा नभाचे
भूभार शेष धरि संतत मस्तकांहीं
भूपा विराम जनरक्षणिं लेश नाहीं.

वाक्योपमा—एक उपमान वाक्य व दुसरें उपमेय वाक्य हीं उपमावाचक शद्बांनीं जोडलेलीं असतात तेथें **वाक्योपमा** अलंकार होतो.

उदाहरण—मोरोपंती—आर्या

जशि अब्जिनी प्रमुदिता उदितार्कानें विलोकितां होती
तशि हर्षली अयोध्या पाहुनि रघुवंशभूषणा हो ती.

मालोपमा—एकाच उपमेयास अनेक उपमा दिलेल्या असतात तेथें **मालोपमा** अलंकार होतो. (पूर्णोपमेचा रघुनाथ पंडितांचा श्लोक पाहा.)

उदाहरण—मोरोपंती—आर्या

सौभद्र ह्मणे शिरतों व्यूहीं डोहीं जसा मतंगज वा
हरिपोत दंतियूथीं कीं दहनीं करुनियां पतंग जवा.

२० उपमेयोपमा

ह्या पर्वताप्रमाणें तो हत्ती आणि तो हत्ती ह्या पर्वताप्रमाणें दिसतो अशाप्रकारें उपमान आणि उपमेय यांची अन्योन्य समता वर्णिली असते तेथें **उपमेयोपमा** अलंकार होतो. (साधारण धर्म कधीं उक्त असतो, कधीं नसतोहीं.)

उदाहरण—आर्या (रा. वा तळेकर शास्त्री)

आकाशापरि जल हें आकाश दिसे जलापरी विमल
चंद्रासम हंस तसा चंद्रहि हंसासमान हा धवल.

२१ उल्लेख

हा चंद्र चोरास शत्रु, चकोरास मित्र, कमलास बंधु दिसतो अशाप्रकारें एकाच उपमानाचे अनेक धर्म सांगून उपमात्मक वर्णन असतें तेथें **उल्लेख** अलंकार होतो.

उदाहरण-श्लोक—वामनी

मल्लां वज्र गमे, नरां नृप गमे, काम स्वयें स्त्रीजनां
गोपां आप्त, खलां नृपां प्रभु, शिशू मातापित्यांच्या मना
कंसा मृत्यु, अशक्त पामर जनां संतासि तत्वामृत
श्रीशेषासन यादवां हरि दिसे रंगांत रामान्वित.

२२ काव्यलिंग

ह्मणून, कारण इत्यादि शद्ब व्यक्त अथवा अध्याहृत असून कार्यकारण भावाचें यथार्थ वर्णन असतें, समर्थनीय अर्थाचें सुयुक्तिक समर्थन केलेलें असतें तेथें **काव्यलिंग** अलंकार होतो.

उदाहरण—मोरोपंती केका

न पावसि ह्मणोनि मी ह्मणतसें तुला आळशी
बरी न असदुक्ति हे रविसखोत्थिता आळशी
असंख्य जन तर्पिले क्षुधित एकला जेमनीं
चुकेल तरि त्यास दे परि वदान्य लाजे मनीं.

२३ चेतनगुणोक्ति

निर्जीव पदार्थ सजीव आहे अशी कल्पना केली असते तेथें **चेतनगुणोक्ति** अलंकार होतो.

उदाहरण—मोरोपंती आर्या

दावी रडोनि झाले जे गंध उगाळितां स्वहात किणी
भीम ह्मणे विधिलेखनि लेखनि नच वचकलीस घातकिनी
कार्ष्णि ह्मणे पळ इकडे पाहुन सज्जन न पत्रिकेतुकडे
चर्मापरि लिहिले कीं वपुचे मज्जन न पत्रिके तुकडे.

२४ तुल्ययोगिता (दीपक)

जेथें दोन प्रस्तुत अथवा अप्रस्तुत पदार्थांचें अथवा गोष्टींचें साम्य त्या दोहोंतील साम्यतादर्शक गुण अथवा धर्म सांगून केलें असतें तेथें **तुल्ययोगिता** (दीपक) अलंकार होतो.

उदाहरणें—मोरोपंती केका

कथासुरभि या भल्या स्वजननीहुनी वाटती
शिशूंसि जरठांसही निरखितां रसें दाटती
दुहोत भलते सदा, तरि न लेशही आटती
स्ववत्समल भक्षिती परि न सर्वथा वाटती.

श्लोक–रघुनाथ पंडित

चंद्रासि लागति कळा उपराग येतो
गंगेस भंग बहु पाणउतार होतो
जैं चूर्ण होय तरि मौक्तिक तें कशाला
नाहीं समान नलराजमहाशयाला.

२५ दृष्टांत

दृष्टांत ह्मणजे दाखला. सांगावयाची गोष्ट अथवा कळवावयाचा अर्थ सहज व चांगला समजावा ह्मणून दुसऱ्या गोष्टीचा अथवा अर्थाचा दाखला दिला असतो तेथें **दृष्टांत** अलंकार होतो. दृष्टांत आणि उपमा यांत पुष्कळसें साम्य आहे. अंतर हें आहे कीं, उपमेंत अमुक वस्तु अमुक वस्तूसारखी आहे असें वर्णन असतें, आणि दृष्टांतांत अमुक गोष्ट अमुक गोष्टीसारखी आहे असें वर्णन असतें.

उदाहरणें–श्लोक वामनी

न कळतां पद अग्निवरी पडे। न करि दाह असे न कधीं घडे
अजित नाम वदो भलत्या मिसें। सकळ पातक भस्म करीतसे.

मोरोपंती केका

धना परिजनां घरीं तुमचिया उणें कायसें?
न लाभ मणिहेमभूपतिस जोडिल्या आयसें
परि प्रभुहि संग्रहीं सकल वस्तुला ठेविती
गुणा न ह्मणतां उणा, अधिक आदरें सेविती

रघुनाथ पंडित

हें पाखरूं मजसि येइल काय कामा?
ऐसें नृपा न वद पूरितलोककामा
मोलें उणें व्यजन तें धरितां पुढारी
छाया करी तपनदीप्तिसही निवारी

२६ निदर्शना

मूर्खास उपदेश करणें ह्मणजे पालथ्या घागरीवर पाणी घालण्यासारखें आहे. अशा प्रकारें कार्याची असंभाव्यता वर्णिली असते तेथें **निदर्शना**

अलंकार होतो. (वाक्यार्थ नि०, पदार्थ नि० बोधन नि० असे या अलंकाराचे प्रकार आहेत.)

उदाहरणें—श्लोक वामनी

सर्पातें बिसतंतुनें सुदृढ जो बांधावया पाहतो
किंवा वज्रमणी शिरीषकुसुमें भेदावया इच्छितो
किंवा तो मधुबिंदुनें मधुरता क्षाराब्धिला आणितो
जो मूर्खासि सुभाषितें वश करूं ऐसें ह्मणीं बोलतो.

मोरोपंती आर्या

त्वद्गुणतस्कराला केला मीं बोध फार आरडलों
अंधभसितबाधिरीं तें दीप हवन गीत कीं वनीं रडलों

२७ परिकर

यथार्थ विशेषण खुबीदार रीतीनें योजून वाक्यार्थ साधला असतो तेथें **परिकरालंकार** होतो.

उदाहरण—मोरोपंती आर्या

कीं पतित पति त्यागुनि विश्वशरण्याकडे रडत वाटे
आली जी श्री लंका तीचा तो सांजनाश्रुपथ वाटे.

२८ परिकरांकुर

विशेषण साभिप्राय असतां **परिकर** अलंकार होतो तसा **विशेष्य** साभिप्राय असतां **परिकरांकुर** अलंकार होतो.

उदाहरण—मोरोपंती—केका

असें न ह्मणशील तूं वरदवत्सलश्रीकरा
परंतु मज भासलें ह्मणुनि जोडितों मी करा
दिलें बहु वरें खरें परि गमे कृपा व्यंग ती
अलंकृतिमती सती मनिं झुरे न जों संग ती.

२९ परिसंख्या

अनेक वस्तू सांगून त्यांतून एकीची आवड व दुसऱ्याची नावड **दाखविली** असते तेथें **परिसंख्या** अलंकार होतो.

उदाहरण—श्लोक वामनी

श्रुतेंचि कीं श्रोत्र न कुंडलानें। दानेंचि कीं पाणि न कंकणानें
साजे तसा देहहि हा न आनें। परोपकारेंचि न चंदनानें.

३० पर्यायोक्ति

सरळ साधें वर्णन न करितां तिखट मीठ लावून चटकदार वर्णन केलेलें असतें तेथें **पर्यायोक्ति** अलंकार होतो.

उदाहरण—मोरोपंती—आर्या

केलेंचि धन्य दर्शनदानें येऊनि कानना मातें
अजि देवेश, निववि बहु हे सेवूनि कान नामातें.

३१ प्रतीप

प्रसिद्ध उपमानाला उपमेयाची उलट उपमा दिली असतां **प्रतीप** अलंकार होतो.

उदाहरण—श्लोक

दिसे पद्म नेत्रापरी हे जियेच्या
शशी रम्य वक्त्रापरी रम्य जीच्या
तुवां पाहिली ती प्रिया कां हरीची
दिसे होय जेव्हां कृपा श्रीहरीची.

३२ प्रश्न

प्रश्नार्थक रचनेनें निश्चयात्मक फलितार्थ साधला असतो तेथें **प्रश्ना-लंकार** होतो.

श्लोक—मोरोपंती

कळी करि सुनिर्मळीं परम उग्र दावा नळीं
तयांत अविशुद्ध मी शलभ जेविं दावानळीं
व्रणार्थ पशुच्या शिरावरि वनीं उभे काकसे
स्मरादि रिपु मन्मनीं, अहि न काळ भेका कसे!

३३ यथासंख्य

दोन जातींच्या वस्तूंचा संबंध क्रमानें जोडून दाखविला असतो तेथें

यथासंख्य अलंकार होतो.

उदाहरणें–श्लोक–वामनी

तृणें मृगाला सलिलें झषाला, संतोष दे वृत्ति महाजनाला
तयास निष्कारण तीन वैरी, किरात कैवर्तक दुष्ट भारी.

श्लोक–उत्तररामचरित्रांतील

तृण जल वनधान्यें देउनी अंजलीनें
मृग तनु शकुनी जे पोषिले मैथिलीनें
निरखुनिच तयातें होय कांहीं विकार
द्रवसम हृदयाला स्पष्ट हा भेदणार.

प. गोडबोले.

३४ भाविक

झालेल्या किंवा पुढें होणाऱ्या गोष्टींचें त्या आजच घडत आहेत असें वर्णन असतें तेथें **भाविक** अलंकार होतो.

उदाहरण–श्लोक

पद्मांचा नाश झाला शिशिर ऋतुमुळें कांसवें सर्व मेलीं
कोळ्यांनीं मत्स्य नेले, दिनकरकिरणीं मज्जलें शुष्क झालीं
व्याधांनीं संहरीले विहग कमलिनी नाशिल्या वारणांनीं.
झालों बापा ! घना मी हतविभव, मला टाक आतां भरोनी.

ना. न. फडणीस.

३५ रूपक

तो राजा साक्षात् धर्म आहे अशाप्रकारें उपमान आणि उपमेय यांत अभेद वर्णिला असतो तेथें **रूपक** अलंकार होतो. उपमेचा मालोपमा तसा रूपकाचा **मालारूपक** असा प्रकार आहे.

उदाहरणें–मोरोपंती–आर्या

दुष्यंतसद्मपद्मीं ती स्त्री श्रीकण्वभानुशिष्यकरीं
नेली पुत्र सुगंधासह धर्मनयांबुपूर्णनगरसरीं.

श्लोक–वामनी

आशा थोर नदी, मनोरथ तिचें पानीय वीची तृषा
स्त्रीपुत्राद्यनुराग दे जलचरें जे पूर्ण कूलंकषा
संसारभ्रमभोंवरा गरगरी चिंताद्य जीचीं तटें
तीतें जे तरले मुनीश न कधीं ते पावती संकटें.

श्लोक–शार्दूलविक्रीडित

शाखा सद्गुण पालवी विनयही विश्रंभ मूलें दया
छाया, स्वाचरण प्रकांड फुललीं चारित्र्य पुष्पें जया
सत्कारोपकृती फलें, रस सुधातुल्या गिरा वाहती
ऐशा सज्जनपादपावरि सुहृद् पक्षी सुखें राहती.

प. गोडबोले

३६ रूपकातिशयोक्ति

राजाचे पोटीं हा कुलदीपकसूर्य आला अशा प्रकारें उपमेयाचा स्पष्ट निर्देश न करितां उपमानानेंच त्याचा बोध केला असतो तेथें **रूपकातिशयोक्ति** अलंकार होतो.

उदाहरण–मोरोपंती केका.

प्रभो शरण आलियावरि न व्हा कधीं वांकडे
ह्मणोनि इतुकेंच हें स्वहितकृत्य जीवांकडे
प्रसाद करितां नसे पळ विलंब बापा खरें
घनांबु न पडे मुखीं उघडिल्याविना पांखरें.

३७ लोकोक्ति

जेथें एखाद्या लोकप्रसिद्ध उक्तीचें–भाषणाचें–अनुकरण असतें तेथें **लोकोक्ति** अलंकार होतो.

उदाहरण–मोरोपंती केका

कवीश्वर मनःपयोनिधि सुतास्तुतीच्या पते!
भले न वरिति स्तुतिप्रति न जोडिती पाप ते
गळां पडति ज्यांचिया तव गुणैकदेशभ्रमें
तिहीं तुजचि दावितां भजति बा! तुला संभ्रमें.

३८ विनोक्ति

अमुक एका वस्तूवांचून अमुक वस्तु शोभत नाहीं किंवा विशोभित होत नाहीं असें वर्णन असतें तेथें **विनोक्ति** अलंकार होतो.

उदाहरण–श्लोक–मोरोपंती

अलंकारें युक्ता रघुपतिकथा शोभत असे
अलंकारें हीना जरि ह्मणति कोणी न विलसे
कृताभ्यंगस्नाना कनकमणिभूषा विरहिता
विराजे सिंदूरें धवल वसनें भूपवनिता.

३९ विभावना

कारणावांचून अथवा विरुद्ध कारणापासून कार्याची उत्पत्ति झाल्याचें वर्णन असतें तेथें **विभावना** अलंकार होतो.

उदाहरण–मोरोपंती केका

पदाब्जरज जें तुझें सकल पावनाधार तें
अघाचलहि तारिले बहु तुवांचि राधारतें
अजामिळ अघासुर व्रजवधू बकी पिंगळा
अशां गति दिली उरे न तृण भेटतां इंगळा.

४० विरुद्धगुणन्यास

दोन वस्तूंचे परस्पर विरुद्ध गुण स्पष्टपणें सांगून त्यांची तुलना केली असते तेथें **विरुद्धगुणन्यास** अलंकार होतो.

उदाहरण–श्लोक वामनी

धनपति जरि तूं रे मी असें शास्त्रवेत्ता
भट समरिं जरी तूं मी महावादिजेता
अनुचर जरि तूतें सेविती छात्र मातें
न गणसि मज जातों तुच्छ मानूनि तूतें

४१ विरोध–विरोधाभास

एका पदार्थावर एक किंवा अधिक धर्मांचा [दोन वस्तूंत वस्तुतः विरोध नसतां] वृथा आरोप केला असतो तेथें **विरोधाभास** अलंकार

होतो. (जाति, गुण, क्रिया, द्रव्य किंवा संज्ञापरत्वें विरोध अलंकाराचे अनेक प्रकार होतात.)

उदाहरण–मोरोपंती केका

सदैव नमितां जरी पदललाट केलें किणें
नसे इतर तारिता मज भवत्पदाब्जाविणें
नतां करुनि मुक्त ही ह्मणसि मी बुडालों रिणें
अशा तुज न जो भजे मनुज धिक् तयाचें जिणें.

४२ विशेषोक्ति

कारणसामुग्री असूनही कार्य–उत्पत्ति होत नाहीं असें वर्णन असतें तेथें **विशेषोक्ति** अलंकार होतो.

उदाहरणें–श्लोक वामनी

व्याघ्रापरी भय करीत उभी जरा रे
देहासि रोग करिती रिपुतुल्य मारे
आयुष्य भिन्नघटनीर सरे तसें हें
पापें तथापि जन आचरतात पाहें.

श्लोक–शार्दूलविक्रीडित

आम्राला फुटल्या कळ्या, तरि तयां नाहीं परागस्थिती
झाले चंपक जातपल्लव तरी त्या कोरकावस्थिती
अर्धोच्चारित पंचमस्वर गळां पुंस्कोकिल स्थापितो
वाटे कामभयें तशां तिज शरां ओढोनि आटोपितो.

प. गोडबोले

४३ विषम

परस्परांशीं अयोग्य अशा गोष्टींचा संबंध वर्णिला असतो, कार्याच्या गुणांच्या क्रमाविरुद्ध कार्याची उत्पत्ति वर्णिली असते, किंवा इष्टार्थाऐवजीं अनिष्ट अर्थाची प्राप्ति सांगितली असते तेथें **विषम** अलंकार होतो.

उदाहरण–मोरोपंती केका

किती वय ? कसें तप प्रखर ? काय विश्वास तो ?
ध्रुव ध्रुव खरा; स्तवा उचित होय विश्वास तो

कशी तुळितसां तुह्मी प्रकट मेरुशीं मोहरी?
प्रसाद करितां उणें अधिक नाठवा हो हरी?

४४ व्यतिरेक

उपमान आणि उपमेय यांचें साधर्म्य आणि वैधर्म्य तसेंच केव्हां नीचोच्चत्व दाखविलें असतें तेथें **व्यतिरेक** अलंकार होतो.

उदाहरण–मोरोपंती केका

गमो मधुर हें विष स्तवन, सेवितां माजवी
करी मलिन सद्यशोमुख हलाहला लाजवी
हरापरिस तूं बरा प्रभुवरा सदा जो पिशी
असा रस समर्पि त्या अमृत आपुलें ओपिशी.

४५ व्याजस्तुति

वरून स्तुति परंतु वस्तुतः निंदा किंवा उपहास केला असतो तेथें **व्याजस्तुति** अलंकार होतो.

उदाहरणें–श्लोक वामनी

पितामह वदे तदा प्रबळ तूं पृथानंदना
रमेश रथिं सारथी, चतुर वागवी स्यंदना
स्वयें गतवयस्क मी, सरस वीर तूं रे नवा
भिडे रणधुरंधरा, जय घडो सुखें वा न वा

दिंडी (रघुनाथ पंडित)

बघुन माझी हे कनकरूप काया
कटक–मुगुटादिक भूषणें कराया
कशी आशा उपजली तुला राया
नाहिं कांहीं तूजला दया माया

४६–४७–४८ स्मरण–भ्रांति–संदेह

उपमानाचें स्मरण, उपमानांविषयीं भ्रांति, उपमानाविषयीं संदेह हीं वर्णिलीं असतात तेथें अनुक्रमें **स्मरण–भ्रांति–संदेह** अलंकार होतात.

स्मरण

उदाहरण–मोरोपंती आर्या

बहु रक्त दिसे, खेळुनि होय जसा काय बा गुलालातें
पळतां कर्ण, स्मरलें, भिउनि पळे पोर बागुलाला तें.

संदेह–भ्रांति (भ्रांतिमान्)

उदाहरणें--श्लोक–रघुनाथ पंडित.

चाफेकळीपरिसही सरलत्व नाकीं
जीचा धरी अधर विद्रुमभावना कीं
भासे मनांत मज बिंबफलभ्रमानें
कीं सत्य चंचुपुट वोढविलें शुकानें.

भृंगें विराजित नवीं अरविंदपत्रें
पाहूनि मानुनि तिचींच विशाल नेत्रें
घालीन अंजन अशा मतिनें तटाकीं
आहा ! वृथा उतरलों भिजलों विलोकीं

(शंका आली कीं **संदेह** आणि शंकेवरून कृति घडली कीं **भ्रांतिमान्** अलंकार मानितात. तरी हे दोन्हीही उत्प्रेक्षेचेच प्रकार आहेत. **संदेह** अलंकारांत संदेहाचें निरसन असल्यास निश्चयांत संदेह अलंकार होतो.)

४९ सम

कार्य–कारण यांचें यथास्थित वर्णन असतें, दोन बऱ्या वाईट वस्तूंची परस्परांना अनुरूप अशी जुळणी झाल्याचें वर्णन असतें तेथे **सम** अलंकार होतो.

उदाहरण–मोरोपंती--केका

तुझ्या बहुत शोधिले अघनिधी पदाच्या रजें
न तें अनृत वर्णिती बुधजनीं सदाचार जे
असे सतत ऐकते, सतत बोलते मीच ते
प्रमाण न ह्मणो तरी उचित माझिया नीचते.

५० समाधि

एका कारणास दुसऱ्या एका किंवा अनेक कारणांची बळकटी मिळून कार्य घडल्याचें किंवा सोपें झाल्याचें वर्णन असतें तेथें **समाधि** अलंकार होतो.

उदाहरण—श्लोक

आधींच मर्कट तशांतहि मद्य प्याला
झाला तशांत जरि वृश्चिकदंश त्याला
झाली तयास तदनंतर भूतबाधा
चेष्टा किती मग वदूं कपिच्या अगाधा

५१ समुच्चय

गुणसमुदायेंकरून अनेक कारणांनीं एकाच वेळीं कार्यसिद्धि **वर्णिली असते** तेथें **समुच्चय** अलंकार होतो.

उदाहरण—मोरोपंती केका

जगद्गुरु महेश्वरप्रभुशिरीं जिचें नांदणें
तिच्या जळमळें तुळे न शरदिंदुचें चांदणें
प्रजा हरिहरां अशा यदुदरीं अनेका कवी
भिऊनि ह्मणतील कां जशि सुधा तशी काकवी ?

५२ सार

एकापेक्षां एक अधिक असें चढत्या-उतरत्या पायऱ्यांनीं गुणवर्णन असून शेवटीं सर्वांचें सार सांगितलें असतें तेथें **सार** अलंकार होतो.

उदाहरण—मोरोपंती केका

वजावन करावया बसविलें नखाग्रीं धरा;
सलील तइं मंदराख्यहि नग स्वपृष्ठीं धरा;
वराहतनु घेउनी उचलली रदाग्रें धरा;
सुदुर्धर तुह्मां कसा पतित हा न कां उद्धरा ?

५३ सहोक्ति

दोन गोष्टी एकच कार्य (क्रिया) करितात असें सह किंवा तदर्थ व्यंजक शब्द योजून वर्णन असतें तेथें **सहोक्ति** अलंकार होतो.

उदाहरण—मोरोपंती केका

तुझे कथिति गोपिका विविध तीस बोभाट ते
सुखप्रद गुणस्तवापरिस जाहले वाटते
क्षमा न करि एकदां तरिहि फार खोडी करा
न देचि भय ताडनोद्यमसमेत सोडी करा

५४ स्वभावोक्ति

जात्यादिकांच्या ठायीं असणाऱ्या रूपाचें, गुणाचें, वर्णाचें, स्वभावाचें, व तदनुरूप हालचालींचें, हावभावाचें जेथें यथार्थ वर्णन असतें तेथें **स्वभावोक्ति** अलंकार होतो.

उदाहरणें—श्लोक—रघुनाथ पंडित

कलकलकल हंसें फार केला सुटाया
फडफड निजपक्षीं दाविलें कीं उडाया
नृपतिस मणिबंधीं टोंचिता होय चंचू
धरि सुदृढ जया तो काय सोडील पंचू ?

श्लोक वामनी

पृथु नितंब नितंबिनिचा वरी । कटितटीं कटिसूत्रचि सांवरी
कनककंकणवृंदहि वाजती । सुखसुखश्रमबिंदु विराजती
श्रवणिचे श्रवणीं नग हालती । गळति गुंफलिया शिरिं मालती
घुसळितां कुचकुंभहि कांपती । अमृत ज्यांतिल घे कमळापती

मोरोपंती—केका

मला निरखितां भवच्चरणकन्यका आपगा
ह्मणे अगइ एकिलेंहि न कधीं असें पाप गा

कर श्रवणिं ठेवितें नुघडि नेत्र घे भीतिला
न घालिन भिडेस मी जरिहि कार्यलोभी तिला.

५५ संसृष्टि

परस्पर निरपेक्ष अशा अनेक अलंकारांचें एकाच पद्यांत संमेलन झाल्यास **संसृष्टि** अलंकार होतो.

श्लोक—मालिनी

सरसिज खुलतें तें शैवलेंही नितांत
शशधर मलिनेंही लांछनें होइ कांत
रुचिर दिसतसे ही वल्कलेंही कुमारी
द्युति मधुर पदार्थां काय देई न भारी?

शाकुंतल

(येथें प्रतिवस्तूपमा आणि अर्थांतरन्यास संमिलित आहेत.)

५६ संकर

एकाच पद्यांत अनेक अलंकारांचे मिश्रण असल्यास **संकर** अलंकार होतो.

उदाहरण—श्लोक—रघुनाथ पंडित

चंद्रासि लागति कळा उपराग येतो
गंगेसि भंग बहु पाणउतार होतो
जें चूर्ण होय तरि मौक्तिक तें कशाला
नाहीं समान नलराज महायशाला.

(येथें तुल्ययोगिता आणि व्यतिरेक यांचा संकर झाला आहे.)

परिशिष्ट.

आधुनिक कवींच्या काव्यांतील रसालंकारावर कांहीं उतारे.

भक्तिरस

श्लोक–शिखरिणी

प्रभो! विश्वोत्पत्तिस्थितिलयनिदाना! सुवदना!
सदा संतत्राणा! दनुजदलना! शेषशयना!
नमो जिष्णो! विष्णो! भुवनविजयिष्णो! स्तुतपदा!
नमो श्रीगोविंदा! परमसुखकंदा! तुज सदा.

अनंततनय

श्लोक–पृथ्वी

नमो भव! रजोगुणें रुचिर विश्व हें निर्मिसी,
नमो हर! तमोगुणें सकल शेवटीं नाशिसी
नमो मृड! असेंच जो निखल सत्वतः पोशिसी,
नमो शिव! परात्परा त्रिगुणशून्य तूं आहसी.

ह. मा. समर्थ.

श्लोक–शार्दूलविक्रीडित

ज्यानें मंजुळ बासरी घुमवुनी त्रैलोक्य संमोहिलें,
सत्या बोधुनि भारतीय समरीं धर्मास संस्थापिलें,
ज्ञानेशादिक थोर जीव रमती यद्गायनीं प्रेमल.
ताराया जगता विटेवरि उभा तो हा सखा विठ्ठल.

आ. कृ. टेकाडे

श्लोक–पृथ्वी

चतुर्भुज गुणाकरा! दरगदारिपंकोद्भव
तुझ्या विलसतीं करीं खलमदा दमायास्तव

चतुर्विध सदायुधें, सगुणरूप जीवेश्वरा!
प्रणाम करितों तुला मज नसे दुजा आसरा.

शार्दूलविक्रीडित

शैलेशाभिमता, कुमारहृषिता, भूतेश, सत्यान्विता,
गंगाभूतियुता, विनायकहिता, चक्षुःश्रवोभूषिता,
अब्जालंकरणांकिता, सुरनता, श्रुत्यादिकीं कीर्तिता,
पावे या शरणागता, सुविनता, श्रांता भवग्रासिता.
अठ्ठावीस युगें विटेवर उभा जो चंद्रभागातटीं
आहे ज्या जवळीं उभीच वरदा श्रीरुक्मिणी गोमटी
ज्याचे हस्त कटीं पुढें खगपती भक्ताग्रणी मारुती
वंदूं विठ्ठल पुंडलीक-तुकया-भक्तप्रियश्रीपती.
ब्रह्माविष्णुमहेश एकवटले रूपीं जयाच्या सुर
हस्तीं दंडकमंडलू शिरिं जटा, यत्पादुका सुंदर
अंगीं भस्म, सतेज मूर्ति, भरला स्वानंदभावें सदा
वंदूं तो गुरुदेव दत्त हरितो जो सर्व भक्तापदा.

ह. मा. समर्थ

शांतरस

अभंग

जीवभावें देवा! आह्मीं अमंगळ, जातीचे चांडाळ, थोर नांवें ॥
पांडुरंगा! आह्मी युगाचे दुर्जन, क्षणाचे सज्जन पश्चात्तापें ॥
व्रत एकादशी मात्र हे देहाशीं, नित्य मनापाशीं दिवाळीच ॥
नांवाचेच साव आह्मी थोर थोर, मनाचे हे चोर सर्वकाळ ॥

गोविंदाग्रज

श्लोक–शिखरिणी

असारी संसारीं सकलहि विनाशी दिसतसे,
ह्मणोनी जो सारा हरिपदसरोजा भजतसे,

विरक्ती ज्याला गीं वरुनि जगुं सेवी पतिपरी,
तयाला त्रैलोक्यप्रभुपद नको प्राप्तहि जरी.

लेले शास्त्री

श्लोक–भुजंगप्रयात

सुखी सर्वदा कोण आहे जगांत
सुखें जाहलासे कधीं कोण तृप्त?
झटावें सुखाकारणें दुःख तेणें
घडे आधि हें जाणता कोण नेणें.
असे आदि अंतीं महादुःख ज्याचें
सुखाचें तया काय सौरस्य साचें
ह्मणोनी ह्मणे सत्य जो साधु जाणे
नकोरे सुखाशा निराशाच तेणें
करावी उणी तीव्रता वासनांची
पुढें ठेवितां यत्न चालू तसाची
दिसंदीस होईल अभ्यासयोगें
उणी शेवटीं वासना सर्व भंगे
सरे वासना तें तुरे देहमाया
विदेहत्व देहींच ये, सिद्धि पायां
पडों लागती, मुक्ति सायुज्यता ते
परब्रह्मरूपीं मिळे आत्मयातें.

ह. मा. समर्थ

श्लोक–शार्दूलविक्रीडित

सर्वाधार विशाल काल सहजी विश्रांति देतो जया
दुःखाचा प्रतिकार त्या करुनि ती सोत्साह सेवावया
इच्छा नश्वर वस्तुसंग्रह करी ती पूर्ण मोडावया
दावी मार्ग विभो! कृपा करुनिया दे शक्ति ही चिन्मया.

अनंततनय

श्लोक-उपेंद्रवज्रा

गृहीं धनें द्वारमुखांत पत्नी ॥ गोठ्यांत गाई स्वजन स्मशानीं ॥
अग्नींत काया परलोकमार्गें ॥ येतें जिवा कर्मचि एक संगें ॥

ह. मा. समर्थ

वीररस

श्लोक

उठा आवळा कंबरा वेळ झाला
चला ढाल घ्या खड्ग घ्या लांब भाला
कुणी गोफणी तीर वा घ्या कृपाण
अरी-संगरीं माजवावें तुफान.
निघा सत्वरीं वादळीं जेविं लाटा
चला वेळ झाला धरा घोर वाटा
जमा इष्ट जागीं पळा वायुवेगें
त्यजा आळसा चित्त ठेवोन मागें.

दत्तकवि

आर्या

दैवांचि गांठ पडली आतां मी मन तुझें न मोडीन,
सोडीन प्राणातें परि तुज शरणागता न सोडीन.

परशुराम

आर्या

क्षत्रियधर्म निघावें समरा सांडून वाढलें ताट
अव्हेरून प्रेमें वा स्त्रीनें घातला गळां हात.
मृत्युमुखीं विचरावें रगडावे बाण संगरीं दांतीं
तलवारीचें पाणी प्यावें ये राज्य तेधवां हातीं.
जा समरीं फडकूं द्या स्वयशाचा अरिवरी जरीपटका
जन्मांत न ये कोणा ही सोन्याची पुनःपुन्हां घटिका.

विनायककवि

श्लोक-शार्दूलविक्रीडित

माझी शक्ति अमोघ ती न सहसा होईल कीं निष्फला
कीं कर्णापरि न त्यजील समरीं ऐन प्रसंगीं मला
नाहीं एकचि मी सहाहि रिपुशीं येथें करोनी रण
पादाक्रांत करोनि लाविन तयां दातीं धराया तृण.

अनंततनय

आर्या

मारीन शत्रु सारे दुष्ट जरी भासती बळी परम
हरि जैसा गजयूथीं शिरतों तैसाचि पाव गा परम!

ह. मा. समर्थ

संभोगशृंगार

श्लोक-शार्दूलविक्रीडित

निद्रेचें मिष घे पती तंव खरा निद्रिस्त तो मानुनी,
बाला सद्महि शून्य पाहुनि हळू चुंबी तयालागुनी,
गालीं कंटक पाहतांचि पतिच्या चित्तांत ओशाळली,
तों हांसोनि भुजीं बळें कवळुनी त्यानेंहि ती चुंबिली.

लेलेशास्त्री

श्लोक-वसंततिलका

आलिंगुनी समुद मी हृदयेश्वरीला,
जों चुंबणार धरुनी हसिताननाला.
अंःकाय हे वदलि तों मुरडोनि लोल,
अद्यापि ते स्त्रवति मोद मनांत बोल.

अनंततनय

विप्रलंभशृंगार

श्लोक-पृथ्वी

अगा प्रणयवल्लभा! दिन कसातरी जातसे
परंतु रजनी अहा! परम दुःसहा होतसे

दिसे शयनगेह हें सकल शून्य जातां क्षणीं
न शांति लवही मिळे रुचिर वस्तुही लक्षुनी
तनु क्षणहि राहिना स्थिर मदीय एका कुशी
सदा तळमळे नसे ह्मणुनि एकजागीं उशी
विचेतन करास या उचलतें पुन्हां टाकतें
सबाष्प नयनें प्रिया ! उघडतें पुन्हां झांकतें.

द्. आ. तिवारी

करुणरस

वसंततिलका

होता तसा मजवरी तव लोभ राहो
येतां सख्या मज कधीं विसरूं नको हो !
मी पूर्व वैर गिळुनीहि मदंतकालीं
जी मागतों तुजसि ती मज भीक घाली.

अनंततनय

श्लोक–मंदाक्रांता

आयुष्याची ममहि घटिका पूर्ण जेव्हां भरेल,
तो सोन्याचा दिवस कुलजे ! आपणाला मिळेल
अन्योन्यांचीं विरह–हृदयें सत्य होतील एक,
कंठूं काळा तंववरि दिना मोजुनी एक एक.

द्. आ. तिवारी

पद चाल–उद्धवा शांतवन

सांगुनी असें सकलांशीं । मृत बाळ उराशीं धरुनी
तन्मुखीं स्वमुख ठेवोनी । चुंबिलें एकदां फिरुनी
पाहिलें नीट निरखोनी । अणि तीही गेली निजुनी
मग पुन्हां कधीं ती उठली
जाणीव कुणा ही कुठली

परि मति या प्रश्नें हटली
बोलेल कोण या बोला । ' राजहंस माझा निजला '

गोविंदाग्रज

अद्भुतरस

श्लोक–वसंततिलका

जी जन्मतांच दुहिता नयनाभिराम
गोदू असे श्रुत तिचें स्वजनांत नाम
ये यौवनीं नवल तें परि काय होई
होती तिला पुरुषधर्म असोनि बाई.

अनंततनय

हास्यरस

(शिमग्यांतील धुळवडीचें वर्णन)

आणून गाढव तयावरि बैसवोनी
एकास त्यास बुरणूसचि नेसवोनी,
डोक्यावरी धरुनि सूपचि छत्र, त्याची–
नेती वरात बहु गोजरिया वराची.
घोडे पुढें बहुत चालति कोतवाल,
मध्यें वराश्व धरितो बहु मंद चाल;
मागें वराडिजन चालति राजमार्गीं,
ऐशी वरात नच पाहिल तो अभागी!

उत्सवप्रकाश

श्लोक–शार्दूलविक्रीडित

खाई गाववडे गुरु मग अपानद्वार झालें खुलें
धौं धौं वात निनादयुक्त निघतां भी घेति तान्हीं मुलें
पोथ्यांचीं उडतीं दलें, लंवडती दौतीहि वाऱ्यामुळें
विद्यार्थी हंसती तदा खदखदां पोटां धरोनी बळें.

लेलेशास्त्री

भयानकरस

श्लोक–वसंततिलका

त्या रक्तदृष्टि अपुल्यावरि लागलेल्या
जिव्हा विलोल हृदयास चटावलेल्या
दंष्ट्रा कराल रदनावलिही सुतीक्ष्ण
तीं लोहवक्रवलयें यमपाश आन.
वर्णें विकृष्ण वरुनी परि वक्षि कृष्ण
वस्त्रेंहि कृष्ण सगळीं असि कोष कृष्ण
गोपालकृष्ण जरि धीर पडोचि कृष्ण
कृष्णांबरांतरि जसा घनवृंद कृष्ण.

अनंततनय

वत्सलरस

दिंडी

गमे मावळला भाग्यसूर्य मातें । असा कां ये ये बाळ वदसि मातें
बळें ओढोनी उरीं आकळीलें । शिरीं चुंबोनी दिव्य दृष्टि केलें
गळां माळा कंटकाश्रिता होती । काव्य कुसुमांची तीव्र दुःख देती
हृदयशल्यें तीं कंटकें दूर केलीं । करें मालेंतिल धूलि संहरीली
अशी माला उज्वलित ती करोनी । गळां माझ्या घातली त्वां फिरोनी
उरीं धरुनि वदलीस हो चिरायू । मला झाला क्षण एक हर्षवायू

ह. मा. समर्थ

अलंकार

अनुप्रासः—

श्लोक–भुजंगप्रयात

रुरूनाशनें रम्यरूपीं रमावें। रमेनें रतीनें स्वरूपीं भरावें॥
रहावें मनीं रुद्ररूपावतारें। पदाच्या रजीं मी तरी राघवा रे॥

ह. मा. समर्थ

श्लोक–शार्दूलविक्रीडित

श्रीमंन्मंगल मंगलप्रद असे जेथें उभा सर्वदा
मोदें तेंवि सदा सदाश्रितपदा श्रीशारदा सर्व-दा
पद्माही करि सद्म ज्यास अपुलें त्या मंडपीं मंगल
जोडी मंगल कार्य मंगलतरा चिन्मंगला मंगल!

गोविंदाग्रज

यमक

श्लोक

यें कृष्णनाथा! सदया! उदारा!। दारा बघे वाट धरून दारा
ये वासुदेवा! यदुवंशसारा!। सारावया घोर निशा असारा
ऐकोनिया भाक तया सतीची। आली दया शीघ्र तयास तीची
आला त्वरें तत्सदना हरी तो। जो भक्तबाधा सगळी हरीतो

आर्या

कामाभिहतापुरुषा बहुरामासंग लिंगभंगद रे!
कामाभिहतापुरुषा बहुरामासंग लिंगभंगद रे!

ह. मा. समर्थ

श्लेष

श्लोक–वसंततिलका

जीमूतवाह–असुदान मना गमेना
तें व्यर्थ दान शिबिचेंहि मनास ये ना

झालें कुदान बलिचें कविला न मान्य
दानासमान हरिच्या जगतीं न अन्य.
ह. मा समर्थ

अतिशयोक्ति

श्लोक-शार्दूलविक्रीडित

येथें एक असे सुवर्णलतिका जी बोलते चालते,
आलें पद्म तिच्यावरी अतिशयें जें कांतिनें शोभतें,
त्या पद्मींच विराजतीं कुवलयें हीं दोन कैसीं पहा,
ऐसी अद्भुत सृष्टि देखुनि मला वाटे चमत्कार हा.
लेलेशास्त्री

अनन्वय

श्लोक-पृथ्वी

सुवर्णशुचि शब्द तूं मधुरवाक्य तूं, अर्थ तूं,
रसाल रसमूर्ति तूं, यमक तूं, अलंकार तूं,
अनंत-गुण काव्य तूं, कवि अनादि वागीश तूं
तुला रसिक तूं, नसे तुजसमान, तूं एक तूं.
दत्तकवि

अनुषंग

श्लोक-शार्दूलविक्रीडित

होता कोणी दरिद्री नयनरहित जो अंगनाही न ज्याला
त्या दुर्दैवी नराला पशुपति वदला माग देतों वराला,
द्रव्याशा, नेत्र, किंवा परिणयसुख हीं इच्छितों मी न देवा!
देशी दे दे तरी कीं विभवयुत सुखी पौत्र यानें पहावा.
नारायण नरसिंह फडणीस

अनुज्ञा

श्लोक-स्रग्धरा

लज्जे! जा सिंधुमध्यें गिरिवरशिखरीं बैस तूं गे! प्रतिष्ठे!
गर्वा! तूं ठेंगणा हो, मुदित तुज करो सर्व दिग्भाग शांते!

तेजा पातालमूलीं गमन करि सुखें स्तब्ध हो भानराया !
द्रव्याशा प्रेम दावी मज ह्मणुनिच मी सिद्ध तीला भजाया.

नारायण नरसिंह फडणीस

अपन्हुति

श्लोक–शार्दूलविक्रीडित

कां हा स्वेद असा प्रिये ! प्रियकरा ! त्वन्नेत्रवन्हीमुळें
देहीं कंप किमर्थ हा शशिमुखी ? भोगींद्रभीतीमुळें,
कां रोमांच अमूप देवि ? भगवन् ! हे जान्हवीशीकर,
गौरी प्रेमळ–भाव–गोपन–परा तुह्मांस रक्षो चिर !

नारायण नरसिंह फडणीस

अन्योक्ति–अप्रस्तुत प्रशंसा

श्लोक

झाडें पालवती लता उगवती वेलां फुलें शोभतीं
मेघें वृष्टि करूनि तुष्टि दिधली सृष्टीस पुष्टीहि ती
रे रे चातक काय पातक तुवां केलें न आह्मां कळे
वारि वर्षुनि भारि एक कणही त्याच्या न तूंतें मिळे
आंबे चंदन चंपकादिक तरू सारेच कां वाळले ?
पद्मांनीं भरलें जलाशय लया कीं सर्वही पावले
झालीं निर्मद आणि शुष्क करिचीं कीं सांग गंडस्थलें
रे मूढा भ्रमरा करीरकुसुम त्वां आज जें चाखलें.

चिपळूणकर

अर्थांतरन्यास

श्लोक–शार्दूलविक्रीडित

पद्मीं प्रीति करी न काक, न धरी तो हंस कूपीं रती
कुस्त्री साधुजनीं रमे नच, पराठायीं रमे ना सती

मूर्खप्रीति बुधीं नसे, न विलसे सिंहासनीं दास तो
जो ज्याचा प्रकृतिस्वभाव असतो तो त्यास ना सोडितो.
ह. मा. समर्थ

होता एक जुनाट आड पडका ओसाडसा जो असे
कोठेंसा, कधिंचा, विशेष नव्हता कोणास तो माहित
होतें काय तयांत हें नच कधीं कोणी पहाया वसे
नाहीं जात कधीं तिथें जन जिथें नाहीं स्वताचें हित.
गोविंदाग्रज

आशी

श्लोक–शार्दूलविक्रीडित

सांभाळी स्पृहणीय वर्णरचना पाळी सुवृत्ताक्रमा
योजी जो उचितस्थळीं लघुगुरू मोजी न दीर्घश्रमा
ठेवी लीन सदर्थ सिद्धिस पदीं सेवा परार्घ्या पदा,
पावो तो कविराज नित्य विजया होवो यशस्वी सदा.
कृ. पां. लिमये

लक्ष्मी कौस्तुभ पारिजातक सुरा धन्वंतरी चंद्रमा
इंद्राचा गज कामधेनु ललना रंभादि रूपोत्तमा
सूर्याचा हय शंख दिव्य धनु तें पीयूष हालाहल,
हीं देवोत समुद्रजन्य चवदा रत्नें तुह्मां मंगल !
ह. मा. समर्थ

उत्प्रेक्षा

श्लोक–वसंततिलका

ही दुःखभोगनगलोकगुहाच थोर
कीं बुद्धिमोहगजविंध्यतटीच थोर
कीं यामिनीच उलुकांस मदादिकांहीं
लक्ष्मी जनांस रुचते न कळेच कां हीं ?

कीं सद्विवेकशशिला अशुरी दशा ही
वैराग्यपल्लवशिरीं हिमराशि कीं ही
कीं चंद्रिकाच सुजनत्वसरोरुहा ही
लक्ष्मी जनास रुचते न कळेच कां हीं ?

ह. मा. समर्थ

उपमा

श्लोक–वसंततिलका

शंभूस होय शिवदा धरितां शिरीं जी
ती जान्हवी निपजली सति ज्या पदाब्जीं
जें होय वज्र भजकाधिगिरी चुराया
तें पादपद्म हरिचें नमिजे तराया

ह. मा. समर्थ

आर्या

शशि भगणीं, मनकरणीं, साधुजनीं तेविं हे तुकाराम
तद्वचनपथक्रमणा त्यजुनि धरिल अन्य हे तुकाराम.

गोविंदाग्रज

काव्यलिंग

आर्या

वारा, वणवा, थंडी, वीज अशीं तुज भयें बहुत असतीं
वृक्षा, करि उपकारा, चंचल ही मृत्युलोकिंची वस्ती.

कृष्णशास्त्री

श्लोक–शार्दूलविक्रीडित

अन्नाच्छादन देउनी जगविणें भीतीसही वारणें
विद्या सांगुनि सद्गुणा शिकविणें कष्टांतुनी तारणें
हें तों भूप करी, ह्मणोनि ह्मणती त्याला प्रजांचा पिता,
तेव्हां केवळ जन्मदत्व उरलें बापाकडे तत्वता.

गणेशशास्त्री लेले

श्लोक-स्रग्धरा

प्राशीला तात एकें, चरणनिहतिनें ताडिला नाथ अन्यें,
वक्त्रीं मद्वैरिणीला द्विजवर धरिती सर्वदा आढ्यतेनें
मोडोनी मद्गृहें तीं द्विजजन सगळे अर्पिती शंकराला
तस्मात् खिन्ना सदा मी अकरुण मतिनें त्यागिलें ब्राह्मणांला

नारायण नरसिंह फडणीस

चेतनगुणोक्ति

श्लोक-मंदाक्रांता (भग्न मंदिरास)

ऐश्वर्यानें मिरवित जगीं पूर्ण होतास जेव्हां,
सर्वांच्या तूं विषय नयनां गोड झालास तेव्हां,
जातां आतां विभव अवघें खिन्नता ये मनाला,
ऐश्वर्याचा प्रथम, मग न यो काल खोटा कुणाला.

दु. आ. तिवारी

दृष्टांत

श्लोक-शिखरिणी

शशी तो आकाशीं जलधि जरि भूमीवरि असे
तरी आकर्षी तो शशि जलधिला तूं मज तसे
कुठें तूं मी कोठें, तुजमजमधें पर्वत कडे
तरी माझें वेडें मन सतत धांवे तुजकडे.

दत्त

श्लोक-उपेंद्रवज्रा

स्वजीवनानें उगवून दाणे। नदी जिवां दे चिर जीवदानें
तैसें कवीच्या कविताप्रवाहें। जीवांत संजीवन दिव्य लाहे
महाकवी थोर नदाप्रमाणें। मी बापडा ओघळ अल्प जाणें
धाकें न ओढा झुळझूळ वाहे। माझी तशी ही गुणगूण आहे

विनायककवि

श्लोक–शार्दूलविक्रीडित

सत्या झांकुनि ठेविलें किति जरी राही न झांकोनि तें
अंतीं दूर करोनि सर्व पटलां रूपा निजा दावितें,
दावी कांच महत्व लोकिं अपुलें घे मान्यता तोंवरी
नाहीं सन्मुख रत्न जों मग तिची होते परीक्षा खरी.

आ. कृ. टेकाडे

परिकर

आर्या

श्रीशा सर्वज्ञातें, सर्वेशातें त्यजोनि जोडुं कर
जातो दुर्धनिकाप्रति साधु ह्मणति नर नव्हेचि तो डुकर

लेलेशास्त्री

श्लोक–शार्दूलविक्रीडित

आहारीं न रती, समस्त विषयीं राहे निवृत्ता मती
नासाग्रावरि दृष्टि मानस तुझें एकाग्र गे संप्रती,
केलें धारण मौन, शून्य तुजला ही भासते मेदिनी,
तूं आहेस वियोगिनी ? वद, सखे किंवा महायोगिनी.

नारायण नरसिंह फडणीस

परिसंख्या

श्लोक–पृथ्वी

पवित्र सरिता करी सकल पाप–भारा दुरी,
स्वशीत किरणें शशी विरहताप सारा हरी,
हरी सकल दीनता पुरवि इष्ट कल्पद्रुम
परी सकलही जगीं पुरवि एक सत्संगम.

आ. कृ. टेकाडे

आर्या

कोणा अंध ह्मणावें न दिसे सन्मार्ग उघडही ज्यास
कोण बधिर जो नाहीं परिसत केल्या हितोपदेशास.

रोगांत कोणता वद रोग भयंकर मनांतली चिंता
औषध काय गुणोत्तम भोजननिद्रादिकांत परिमितता.
कृ. चिपळूणकर

रूपक

दिंडी

देशभक्ता प्रासाद बंदिशाला । शृंखलाच्या गुंफिल्या पुष्पमाला
चिता सिंहासन शूल राजदंड । मृत्यु दैवत दे अमरता उदंड.
विनायककवि

लोकोक्ति

श्लोक–शार्दूलविक्रीडित

ज्याला पाहुनि धीर वीर समरा सोडोनि भांबावले
शस्त्रें टाकुनिया स्त्रियांत दडले, देशोधडी लागले
म्याले, रानधुळींत चीत पडले, अल्लाकडे धावले
झेंडा तो अरिधैर्यभेदक कुठें गेला? कसें जाहलें?
दत्तकवि

जों जों चंदन घाशिती अधिक दे तों तों सुगंधाप्रति
जों जों कांचन तावती अधिक तें तों तों झळाळे अति
जों जों रत्नशिलेवरी उगळिती तत्तेज तों तों चढे
जों जों बद्ध तुला करूं बघति तूं स्वच्छंद तों तों गडे.
दत्तकवि

विभावना

श्लोक–शार्दूलविक्रीडित

अंकीं पर्वतजा, असे फणि करीं, बालेंदु भाळावरी
भस्में चर्चित सर्व अंग विलसे मंदाकिनी ती शिरीं,
शंभूची रमणीय मूर्ति रचिली ऐशी पवर्गी जरी
देते ती अपवर्ग–मोक्ष भजकां ती आठवूं अंतरीं.
ह. मा. समर्थ

विषम

आर्या

" योगेश्वर देव कुठें कोठें हा कर्मयोगवीर नवा
वानावें लोहातें परिसापरि काव्यकार काय तुवां?
गोवर्धन गोकुळिचें कार्य कुठें विश्वमान्य तें हरिचें
हरिचें वैभव हरिणा पूजन देईल काय गणपतिचें ? "

सार

श्लोक–वसंततिलका

आधींच भीषण निशा तम त्यांत घोर
चोहोंकडे वन भयंकर भीति थोर
येतां अशांत तव तापद शद्ब कानीं
घोर स्थितीस जणुं पूर्ण दशेस आणी,

गोविंदाग्रज

स्वभावोक्ति

श्लोक–मालिनी

हळुचि बघुनि, खालीं मान घालूनि बाला,
वळवुनि वदनाला, आवरी अंचलाला
मधुनि मधुनि सोडी चोरुनी दृक्शराला
न कळत मज दावी लज्जिता रम्य लीला.

दत्तकवि

श्लोक–शार्दूलविक्रीडित

हुंगोनी तुज चुंबिलें कपिवरें चाटूनिही चाविलें,
जाणोनी नच योग्यता तव मण्या फेंकूनही दीधलें,
त्याचा खेद नको सुरक्षित तुझें जीवित्व तें राहिलें
अंतर्भाग निरीक्षणार्थ न तुला फोडोनियां पाहिलें.

नारायण नरसिंह फडणीस

परिशिष्ट [अलंकार व्याख्या] २

आर्या

आवृत्ति व्यंजनांची करुनी जो साधिती अलंकार,
नाम **अनुप्रास** तया देती काव्यज्ञ रसिकजन चतुर. १
ते तेच वर्ण योजुनि कवनीं कवि साधिती अलंकार,
जो त्यास नाम देती **यमक** पहा वामनी चमत्कार. २
तोडून शब्द अथवा तोडियल्यावाचुनी अनेकार्थ,
साधियल्या होत असे **श्लेष** अलंकार गोड शब्दार्थ. ३
भेदीं अभेद अथवा भेद अभेदीं असें असंबद्ध,
जें कथन, **अतिशयोक्ति**प्रद तें होतें ह्मणे कवनबुद्ध. ४
सामुग्री असतांही कार्य घडेना ह्मणोन उपरोधी,
वर्णन करुनी कवनीं **अधिक** अलंकार सहज कवि साधी. ५
अनुपम्य ह्मणुनि देती ज्याची त्यालाच सत्कवी उपमा,
तेथें **अनन्वय** घडे, तुजऐसा तूंच एकला परमा ? ६
साध्याचें ज्ञान असे अनुमित हो ! साधनावरून जिथें,
अनुमान नाम साधा होय अलंकार साधलाचि तिथें. ७
एक क्रिया अनेका कार्यांतें साधिते असें कवनीं,
अनुषंग अलंकारा साधाया युक्तिनें कवी वर्णी. ८
दोषासि मानुनी गुण आदरितो तोच जेथ कविराय,
कवनांत त्या **अनुज्ञा** नाम अलंकार साधिला होय. ९
उपमेय न उपमानचि आहे हें वर्णितां असें होतें,
वर्णन **अपन्हुति**प्रद रसिकातें आवडे किती हो ! तें. १०
कवि अप्रत्यक्षानें प्रत्यक्षाची करून दे समज,
तेव्हां **अन्योक्ति** घडे रसिकाच्या रमविते मना सहज. ११
सामान्यानें करुनी सार्थ समर्थन विशेष अर्थाचें,
अर्थांतरन्यास कवी साधी, तो शोभवी कवन त्याचें. १२

जरि कार्य कारण दिशा भिन्न अशा वर्णनांत असतील,
होतील **असंगति**प्रद कवनीं त्या क्वचित रसिक रमतील. १३

गज गोष्पदीं बुडाला वर्णन जेथें असें असंभाव्य,
[अ] **संभावना** अयुक्ता नाम अलंकार साधिते काव्य. १४

मायातमीं प्रियसख्या ऐस सुखें बहुत काळ या परिचें,
आशिर्वाद अलंकृति **आशी** कवनांत साधिती कविचे. १५

आक्षेप घेउनी वा अर्थ करी व्यक्त अर्धवट शब्दीं,
आक्षेप तेथ होतो; क्रुद्ध तरी धेनु दे न विष दुग्धीं. १६

उपमेय तेंच आहे जाणों उपमान भाव हा दावी,
उत्प्रेक्षा साधी तें कवन, जणूं ही बकीच मायावी. १७

ऐश्वर्याचें वर्णन प्रौढ तसें उचितही असे जेथें,
होते अर्थालंकृति रसिकमता जी **उदात्त** ती तेथें. १८

साधर्म्य–साम्य कवनीं वस्तूंचें वर्णिलें असे जेथें,
उपमा अलंकृति घडे, श्रेष्ठ सदा भूषणांत जी, तेथें. १९

एका उपमेयाचे धर्म कथूनी अनेक साधियला,
उल्लेख होय कवनीं रंजवितो तो अनेक रसिकांला. २०

चंद्रासम हंस तसा चंद्रहि हंसासमान ही जेथें,
अन्योन्य होय उपमा **उपमेयोपम** घडे अहो ! तेथें. २१

कारण ह्मणून ऐशा शद्बें जरि कार्यकारणा दावी,
तरि **काव्यलिंग** होतो ह्मणती हा कठिण काय हो सुकवी. २२

निर्जीव पदार्थीं जरि होय कधीं कल्पिलें सजीवत्व,
चेतनगुणोक्ति होतो काय तयाचें ह्मणे कवि महत्व. २३

गुणधर्मा कथुनि जरी वस्तूंचें साम्य वर्णिलें कवनीं,
दीपक साधियला तरि होय अलंकार त्या तशा तुलनीं. २४

'ही गोष्ट असे तैशी जैशी ती' दाखला पुढें करुनी,
सांगे **दृष्टांत** रची, आणी रस सुकवि आपुल्या कवनीं. २५

उपड्या घड्यावर जसें जल हें तैसेंच यापरी वर्णी,
होतें **निदर्शना** तैं वैय्यर्थान्वित यथार्थ कविरचनीं. २६

साभिप्राय विशेषण योजुनिया साधिला अलंकार,
कविनें **परिकर** त्यातें ह्मणति जरी योजना असे चतुर. २७

साभिप्राय विशेष्याप्रति योजी साधण्या अलंकार,
नामें **सांकुर परिकर** कवि, रचना ही असे जरी चतुर. २८

आवड नावड दावी वस्तूंतिल जेधवां कवी कवनीं,
परिसंख्या नाम तदा होय अलंकार मानिला सुजनीं. २९

साधें सरळ न करितां वर्णन जरि तिखट मीठ लावून,
केलें होय तरी घ्या **पर्यायोक्तीच** गोड मानून. ३०

उपमानातें दिधली उपमेयाची असे जरी उपमा
होतो **प्रतीप** तेथें हीचेसम खचित रम्य होय रमा. ३१

प्रश्नींच उत्तर असे सूचित तेथें घडे अलंकार,
प्रश्न अहो अहि न कसा भेकांचा तो करील संहार? ३२

सक्रम संबंध जरी वस्तूंचा दाविला असेल तरी,
साधियला होय **यथासंख्य** अलंकार कविवरीं चतुरीं. ३३

झालेली–होणारी गोष्ट असे घडत आज यापरिचें,
वर्णन **भाविक** नामा अर्थालंकार साधितें कविचे. ३४

साक्षात् धर्मचि तो नृप यापरिची होय योजिली उपमा,
रूपक होय तिथें, हा उतरी संसारसिंधु गा! परमा! ३५

'पडती न गळा' 'न जोडिति पाप' अशा उक्ति लौकिकी ग्रथुनी
लोकोक्ति साधिती कवि रसिकहि होतात तुष्ट त्या कवनीं. ३६

कारण नसतां अथवा उलट्याही कारणावरुनि होते
कार्योत्पत्ति तरी त्या कवनीं घडली **विभावना** होते. ३७
कारण सबळहि असतां न घडे जैं कार्य तैं **विशेषोक्ति**.
होते; असार वदती त्यजिती संसार ना अशी रीति. ३८
वरुनी स्तुति वा निंदा दिसते परि उलट भाव जो कथिला,
असतांना **व्याजस्तुति** घडते, रुचते कितीक रसिकांला. ३९
कार्यास एकचि पुरें कारण असतां अनेक सांगून,
पुष्टि तयाप्रति देई कवनीं कविही **समाधि** साधून. ४०
जातिस्वभाव वर्णन होय यथातथ्य साधिलें जेथें,
होय **स्वभावोक्ति** महा रुचिर अलंकार रसिकमत तेथें. ४१

वृत्तसूची

वृत्त	पृष्ठ	वृत्त	पृष्ठ
१ अभंग	३७	२२ मालिनी	३०
२ अनुष्टुप्	२३	२३ मंदाक्रांता	३१
३ आर्या	३५	२४ मंदारमाला	३३
४ इंद्रवज्रा	२५	२५ यूथिका	२८
५ इंद्रवंशा	२७	२६ रथोद्धता	२७
६ उपजाति	२५	२७ ललित	२६
७ उपेंद्रवज्रा	२५	२८ वसंततिलका	२९
८ उमा	३३	२९ विद्युन्माला	२४
९ ओंवी	२६	३० विभावरी	२९
१० कामदा	२४	३१ वियोगिनी	३४
११ चंपकमाला	४	३२ वैश्वदेवी	२८
१२ चामर	२९	३३ वंशस्थ	२८
१३ तोटक	२७	३४ शार्दूलविक्रीडित	३२
१४ दिंडी	३६	३५ शालिनी	२६
१५ दोधक	२६	३६ शिखरिणी	३१
१६ द्रुतविलंबित	२७	३७ शुद्धकामदा	२५
१७ पृथ्वी	३०	३८ सवाई	३४
१८ पंचचामर	३०	३९ स्रग्धरा	३२
१९ प्रमाणिका	२४	४० साकी	३५
२० भुजंगप्रयात	२८	४१ स्वागता	२७
२१ मदिरा	३४	४२ हरिणी	३२

अलंकार सूची.

अलंकार		पृष्ठ
१ अनुप्रासः-	वृत्यनुप्रास	३९
	छेकानुप्रास	”
	लाटानुप्रास	”
	श्रुत्यनुप्रास	”
२ यमकः-	अत्यं	४०
	चरण	”
	आद्य	”
	पूर्ण	”
	दाम	”
	अश्वधाटी	”
	पुष्प	”
	संयुतावृत्ति	”
	पंक्ति	”
३ श्लेषः-	अभंग	४३
	सभंग	”
४ अतिशयोक्ति		”
५ अधिक		४४
६ अनन्वय		”
७ अनुमान		४५
८ अनुषंग		”
९ अनुज्ञा		”
१० अन्योक्ति		४६
११ अपह्नुति		”

अलंकार		पृष्ठ
१२ अप्रस्तुत प्रशंसा		४६
१३ अर्थांतरन्यास		”
१४ असंगति		४७
१५ असंभावना		”
१६ आशी		”
१७ आक्षेप		”
१८ उत्प्रेक्षा		४८
१९ उदात्त		४९
२० उपमाः-	पूर्णोपमा	”
	लुप्तोपमा	”
	प्रतिवस्तूपमा	”
	वाक्योपमा	”
	मालोपमा	”
२१ उपमेयोपमा		५२
२२ उल्लेख		”
२३ काव्यलिंग		५३
२४ चेतनगुणोक्ति		”
२५ तुल्ययोगिता		”
२६ दीपक		”
२७ दृष्टांत		५४
२८ निदर्शना		”
२९ पारकर		५५
३० परिकरांकुर		”

अलंकार	पृष्ठ
३१ परिसंख्या	५५
३२ पर्यायोक्ति	५६
३३ प्रतीप	”
३४ प्रश्न	”
३५ भाविक	”
३६ भ्रांतिमान	५७
३७ यथासंख्य	”
३८ रूपक	”
३९ रूपकातिशयोक्ति	”
४० लोकोक्ति	५८
४१ विनोक्ति	”
४२ विभावना	५९
४३ विरुद्ध गुणन्यास	”
४४ विरोध	”
४५ विरोधाभास	५९
४६ विशेषोक्ति	६०
४७ विषम	”
४८ व्यतिरेक	”
४९ व्याजस्तुति	६१
५० स्मरण	”
५१ संदेह	”
५२ सम	६२
५३ समाधि	”
५४ समुच्चय	”
५५ सहोक्ति	”
५६ स्वभावोक्ति	”
५७ सार	”

शुद्धिपत्रक.

अशुद्ध	शुद्ध	पृष्ठ
कुंदमाल	कुंदमाळ	प्रस्तावना
श्रुद्ध	शुद्ध	१
शद्बार्थी	शद्बार्थीं सुलभा	१
सुलभा	जियेंत प्रतिभा	
यांस संत	भक्तिला सु-	३
वीररस	वीररसा	३
विप्रसंगीं हो	विप्रसंगींही	३
पाव गा परम	यांत गा परम	७०

इतर अशुद्धें किरकोळ ह्मणजे सहज कळण्यासारखीं असल्यावरून त्यांचा येथें समावेश केलेला नाहीं.